


# त्रिवेणी

वार्षिक अंक १९९३-९४

रयत शिक्षण संस्थेचे

**महिला महाविद्यालय, उंब्रज**

॥ स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद ॥

पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील

## रयत शिक्षण संस्थेचे
## महिला महाविद्यालय, उंब्रज

# त्रिवेणी

सन १९९३/९४

वार्षिक अंक

● संपादक मंडळ ●

अध्यक्ष
प्राचार्य डी. डी. थोरात

प्रमुख संपादक
प्रा. वी. पी. पाटील

सह संपादक
प्रा. एल. पी. जाधव
प्रा. एम. एस. मुजावर
प्रा. एस. डी. भोसले
प्रा. एम. एच. फाटक
प्रा. एन. आर. सूर्यवंशी
श्री. ए. टी. इंगवले

* मुद्रण : प्रिन्ट ओम ऑफसेट, २६८ ब, दौलतनगर सातारा. फोन :- २१०४९

* टाईपसेटींग : टाईप इनोव्हेटर्स, १९५ सदाशिव पेठ, मोती चौक, सातारा. फोन :- २१४७२

# स्थानिक सल्लागार समिती

| | | |
|---|---|---|
| १. | प्राचार्य शिवाजीराव भोर<br>सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा | चेअरमन |
| २. | मा.दिलीपराव रावसाहेब पाटील | सदस्य |
| ३. | मा.दत्तात्रय श्रीपतराव जाधव | सदस्य |
| ४. | मा.शिवाजीराव शंकरराव कुरकुटे | सदस्य |
| ५. | मा.संपतराव गणपती जाधव | सदस्य |
| ६. | मा.सुरेशराव शिवाजीराव साळुंखे | सदस्य |
| ७. | मा.शंकरराव धोंडीबा डुबल | सदस्य |
| ८. | मा.रामचंद्र खाशाबा अर्जुगडे | सदस्य |
| ९. | मा.डॉ.सुनिल तुकाराम कोडगुले | सदस्य |
| १०. | मा.मारुती गणपती जाधव | सदस्य |
| ११. | मा.प्रा.बी.पी.पाटील (प्राध्यापक प्रतिनिधी) | सदस्य |
| १२. | मा.प्रा.एन.आर.सूर्यवंशी (प्राध्यापक प्रतिनिधी) | सदस्य |
| १३. | मा.ए.टी.इंगवले (शिक्षकेतर प्रतिनिधी) | सदस्य |
| १४. | मा.शिवाजीराव पाटील<br>मुख्याध्यापक, महात्मा गांधी विद्यालय, उंब्रज | सदस्य |
| १५. | मा.डी.डी.थोरात<br>प्राचार्य,महिला महाविद्यालय,उंब्रज | सेक्रेटरी |

□ □ □ □

# संपादकीय.....

प्रिय रसिक वाचक हो!

'त्रिवेणी' चा पहिला अंक आपल्या हाती देताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे.

खेड्यापाड्यामध्ये राहणाऱ्या समाजास रात्रंदिवस काबाड कष्ट करूनही पोटभर अन्न आणि अंगभर वस्त्र मिळत नव्हते. त्याच्या अवनतीचे व दुःखाचे मूळ कारण त्याचे अज्ञान-अविद्या हे होते. हे ओळखून कर्मवीर भाऊराव पाटील यांनी १९१९ साली रयत शिक्षण संस्थेची स्थापना करून शिक्षणकार्याला सुरुवात केली. त्यांनी बहुजन समाजाच्या झोपडीपर्यंत शिक्षणाची गंगा पोचविण्याचे महान कार्य केले. जातिभेदातीत व श्रमाधिष्ठित शिक्षणाचा मूलमंत्र देऊन महाराष्ट्रात ग्रामीण शिक्षणाची चळवळ उभारली. अण्णांचा शैक्षणिक दृष्टीकोन साधा, प्रामाणिक, कणखर व सर्वस्पर्शी होता. अण्णांच्या कार्याची प्रेरणा व त्यांचा शैक्षणिक दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेऊन आम्ही वाटचाल करीत आहोत.

शिक्षण हे एकांगी असू नये म्हणून स्त्रियांना शिक्षण दिले पाहिजे. स्त्रिया शिकल्याशिवाय सामाजिक समता येणार नाही व देश बलवान बनणार नाही अशी स्त्री शिक्षणाविषयी अण्णांची भूमिका होती. ही भूमिका डोळ्यापुढे ठेऊन सर्वांच्या सहकार्याने रयत शिक्षण संस्थेने जून १९८९ पासून हे महिला महाविद्यालय सुरू केले. या महाविद्यालयाच्या स्थापनेमुळे उंब्रज व उंब्रजच्या परिसरातील विद्यार्थिनींची १२ वी नंतरच्या उच्च शिक्षणाची सोय झाली. महाविद्यालय सुरू होऊन पाच वर्षे पूर्ण होत आहेत. या कालावधीत या महाविद्यालयातून अनेक विद्यार्थिनींनी पदवी संपादन केली आहे.

उंब्रजच्या परिसराला ऐतिहासिक, राजकीय, सांस्कृतिक व सामाजिक पार्श्वभूमी लाभली आहे. कृष्णा, तारळी व उत्तर मांड या नद्यांचा त्रिवेणी संगम उंब्रजला झाला आहे. हे वैशिष्ट्य ध्यानात घेऊन अंकास 'त्रिवेणी' हे नाव दिले आहे. ताराबाईंचे जन्म गाव तळबीड व चाफळचे राममंदिर जवळच आहे. शिवरायांच्या व समर्थ रामदासांच्या पदस्पर्शाने पावन झालेली ही भूमी आहे. स्वातंत्र्य चळवळीचे वारे इथे वाहिलेले आहे. आधुनिक पद्धतीने शेती करणारे अनेक कृषिभूषण या परिसरात आहेत. सह्याद्रीच्या कुशीत असणाऱ्या व उत्साही माणसांनी बहरलेल्या या परिसराबद्दल आम्हाला सार्थ अभिमान वाटतो.

महाविद्यालयीन जीवन म्हणजे मन, मेंदू व मनगट सुसंस्कारित करण्याचा कालखंड होय. विद्यार्थी हा शिक्षणाचा केंद्रबिंदू आहे याचे आम्ही सतत भान राखले आहे. आमच्या महाविद्यालयाची विद्यार्थिनी बौद्धिक क्षेत्रामध्ये मागे पडू नये यासाठी आम्ही सतत प्रयत्नशील असतो. त्याचबरोबर विद्यार्थिनींचा सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकास व्हावा म्हणून शिक्षणाच्या माध्यमातून त्यांच्यावर आम्ही सुसंस्कारही करीत असतो.

कारण बौद्धिक विकासाइतकेच आम्ही सुसंस्कारित व्यक्तिमत्त्व महत्वाचे मानतो.

विद्यार्थीनींच्या सर्वांगीण उत्कर्षासाठी आमचा प्राध्यापकवर्ग सतत दक्ष असतो. हुशार विद्यार्थीनींच्याकडे विशेष लक्ष पुरविले जाते. एप्रिल १९९२ मध्ये झालेल्या बी.ए. च्या परीक्षेत कु.मनीषा शामराव कदम ही शिवाजी विद्यापीठात दुसरी आली. कु. संगीता प्रतापराव घोरपडे या विद्यार्थीनीने गुणवत्ता शिष्यवृत्ती संपादक केली आहे. महाविद्यालयाचे निकाल भूषणास्पद आहेत. शिवाजी विद्यापीठाने घेतलेल्या परीक्षांचे आमच्या महाविद्यालयाचे निकाल पुढील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| एप्रिल १९९० | बी.ए.भाग १ | ८८.२४% |
| एप्रिल १९९१ | बी.ए.भाग १ | ७६.५९% |
| एप्रिल १९९१ | बी.ए.भाग २ | ९८.०८% |
| एप्रिल १९९२ | बी.ए.भाग १ | ९६.२२% |
| एप्रिल १९९२ | बी.ए.भाग २ | ९५% |
| एप्रिल १९९२ | बी.ए.भाग ३ | ९४% |
| एप्रिल १९९३ | बी.ए.भाग १ | ९४.२३% |
| एप्रिल १९९३ | बी.ए.भाग २ | ९३.०२% |
| एप्रिल १९९३ | बी.ए.भाग ३ | ९१.१७% |

विद्यार्थीनींच्या व्यक्तिमत्त्व वाढीसाठी सांस्कृतिक मंडळ, वादविवाद मंडळ, कर्मवीर विद्याप्रबोधिनी, राष्ट्रीय सेवा योजना, लोकसंख्या शिक्षण, सहल विभाग, जिमखाना इ. मंडळांच्यावतीने विविध योजना राबविल्या जातात. विविध कार्यक्रम साजरे केले जातात. क्रीडा स्पर्धामध्ये सहभागी व्हावे म्हणून विद्यार्थीनींना आम्ही प्रोत्साहन देत असतो. समाजसेवेचे व्रत घेतलेली 'राष्ट्रीय सेवा योजना' महाविद्यालयात राबविली जाते. ५० विद्यार्थीनी या योजनेत सहभागी झाल्या आहेत. पेर्ले येथे यावर्षी दहा दिवसाचे श्रमसंस्कार शिबीर घेण्यात आले. ४० विद्यार्थीनींनी शिबीरात भाग घेतला. या दहा दिवसात विविध विषयावरील व्याख्याने आयोजित करून समाजप्रबोधन करण्यात आले. शिबीरार्थी विद्यार्थीनींनी श्रमदान, ग्रामसफाई, विद्यालयाच्या मैदानाची दुरुस्ती, कौटुंबिक सर्व्हे, वृक्षारोपण, रस्तादुरुस्ती इ. कामे केली. विद्यार्थीनींनी केलेले काम कौतुकास्पद आहे.

आमच्या महाविद्यालयाचे ग्रंथालय सुसज्ज आहे. त्यात मराठी, हिंदी, इंग्रजी या भाषेतील विविध विषयावरील संदर्भग्रंथ, संशोधनपर ग्रंथ, तत्त्वज्ञानपर ग्रंथ व धार्मिक ग्रंथ आहेत. कथा, कादंबऱ्या, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, काव्य या ललित वाङ्मयाचे दालनही परिपूर्ण आहे. दैनिके, साप्ताहिके, पाक्षिके व मासिकेही मागविली जातात. ग्रंथालय हे महाविद्यालयाच्या विकासातील एक महत्त्वाचा दुवा आम्ही मानतो. त्यामुळे ग्रंथालय जास्तीत जास्त समृद्ध करण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत.

आमचा अध्यापक वर्ग अनुभवी व आपापल्या विषयात तज्ञ आहे. आपल्या विषयाशिवाय इतर विषयांचे ज्ञान प्राध्यापकांनी संपादन करावे या करिता स्टाफ ॲकॅडमीमार्फत शोध निबंध वाचून त्यावर चर्चा केली जाते. स्टाफ ॲकॅडमीचे कार्य खरोखर उल्लेखनीय आहे. आमच्या संस्थेत गरजेनुसार बदल्या होत असतात. यावर्षी महाविद्यालयातून प्राचार्य ई.जी.निकम, प्रा.एस.ई.जाधव, प्रा.जे.एस.इंगळे, प्रा.व्ही.बी.पाटील, प्रा.आर.आर.घार्गे, प्रा.डी.एस.कोडोलीकर, प्रा.के.बी.भोसले, प्रा.कु.आर.ए.एम.शेख, प्रा.डॉ.सौ.भुतकर बदलून गेले. त्यांना शुभेच्छा प्राचार्य डी.डी. थोरात, प्रा.बी.पी.पाटील, प्रा.एल.पी.जाधव, प्रा.एम.जे.शिवदास, प्रा.ए.एस.खाडे, प्रा. आर.एस.म्हात्रे, प्रा.आर.एम.यादव, इ. बदलून आले. त्यांचे हार्दिक स्वागत.

महाविद्यालयाच्या स्थापनेपासून **उंब्रज** व उंब्रजच्या परिसरातील ग्रामस्थांचे व हितचिंतकांचे उत्तम सहकार्य लाभले आहे. या सर्वांच्या सहकार्यामुळे व सदिच्छेमुळे महाविद्यालयाने गौरवास्पद अशी वाटचाल केली आहे. गेल्या वर्षी व यावर्षी शासनाच्यावतीने महाविद्यालयाला वाळूचा लिलाव मिळाला त्यात ग्रामस्थांच्या सहकार्याचा फार मोठा वाटा आहे. याची आम्हाला जाणीव आहे. कर्मवीर जयंतीच्या शुभमुहूर्तावर इमारतीच्या बांधकामास सुरुवात केली आहे. आजपर्यंत बरेच बांधकाम झाले आहे. पुढील शैक्षणिक वर्षात इमारत पूर्ण होईल असा आम्हाला विश्वास वाटतो.

प्राचार्य डी.डी.थोरात यांच्या आगमनाने नवचैतन्य निर्माण झाले. प्राचार्य थोरातसाहेब हे कर्तव्यदक्ष व उत्तम प्रशासक आहेत. महाविद्यालयाच्या विकासासाठी ते सतत प्रयत्नशील असतात. त्यांच्या मर्मग्राही विचारसरणीतून त्यांच्या व्यासंगाची व चिंतनशीलतेची कल्पना येते. ते इतिहासाचे गाढे अभ्यासक व विद्यार्थीप्रिय प्राध्यापक आहेत. त्यांनी इतिहासाची अनेक पुस्तके लिहिली आहेत. त्यांची कल्पकता व योजकता वाखाणण्यासारखी आहे. महाविद्यालयातील शैक्षणिक उपक्रम व प्रकल्प यशस्वी करण्यामागे त्यांची प्रेरक शक्ती सतत उभी असते. प्राचार्य थोरातसाहेब म्हणजे आमचे प्रेरणास्थान आहे.

'त्रिवेणी' मधील साहित्य म्हणजे विद्यार्थीनींच्या विचाराचे, अनुभवाचे व भावनांचे कलात्मक शिल्प आहे. या अंकासाठी बरेच साहित्य आले. परंतु पृष्ठसंख्येच्या मर्यादेमुळे आम्ही सर्व साहित्य या अंकात समाविष्ट करू शकत नाही. परंतु जे काही निवडक साहित्य या अंकात प्रकाशित करीत आहोत त्याचा आपण रसास्वाद घ्यावा.

या अंकाच्या संपादन व संयोजनासाठी अनेकांचे सहकार्य लाभले. प्राचार्य, प्राध्यापक व कार्यालयीन सेवक यांचे अमोल सहकार्य लाभले आहे. 'त्रिवेणी' चा अंक सुबक व आकर्षक करण्याचे काम श्री.संदेश शहा, सातारा यांनी केले. या सर्वांचे मन:पूर्वक आभार.

'त्रिवेणी' चा अंक आपणापुढे निटनेटक्या स्वरुपात सादर करण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे. त्याची परिपूर्ती किती झाली हे आपल्या सारख्या सहृदय रसिकांनी ठरवावयाचे आहे. मी आपणाला ज्ञानेश्वरांच्या शब्दात नम्र विनंती करतो.

तऱ्ही न्यून ते पुरते। अधिक ते सरते।
करुनि घेयावे हे तुमते। विनवितु असे।।

**प्रा.बी.पी.पाटील,**
प्रमुख संपादक

# सेवक वर्ग

## प्राध्यापक वर्ग

**इतिहास**
१. प्राचार्य डी.डी.थोरात
२. प्रा.एन.आर.सूर्यवंशी
३. प्रा.जी.एन.ढाले

**मराठी**
४. प्रा.बी.पी.पाटील
५. प्रा.एस.डी.भोसले

**हिंदी**
६. प्रा.एम.एस.मुजावर
७. प्रा.एम.जे.शिवदास

**समाजशास्त्र**
८. प्रा.आर.एस.यादव
९. प्रा.सौ.एस.आर.माने

**इंग्रजी**
१०. प्रा.एल.पी.जाधव

**अर्थशास्त्र**
११. प्रा.आर.एस.म्हात्रे

**भूगोल**
१२. प्रा.ए.एस.खाडे

**मानसशास्त्र**
१३. प्रा.एम.एम.पाटील

**लोकप्रशासन**
१४. प्रा.सी.डी.पाटील

**शारीरिक शिक्षण**
१५. प्रा.एम.एच.फाटक

## कार्यालयीन सेवक वर्ग


| | |
|---|---|
| १. श्री.एस.आर.गोडसे, | ग्रंथपाल |
| २. श्री.ए.टी.झंवले, | ऑफिस सुपरिंटेंडंट |
| ३. श्री.व्ही.बी.थेटे, | सिनि.क्लार्क |
| ४. श्री.एच.एस.यादव, | ज्युनि.क्लार्क |

## शिपाई


५. श्री.आर.बी.कांबळे
६. श्री.के.के.निकम
७. श्री.ए.एस.कांबळे
८. श्री.सी.आर.खटावकर

❑ ❑ ❑ ❑


# आमची प्रेरणा



प्राचार्य डी.डी.थोरात



प्राचार्य, प्राध्यापक व कार्यालयीन सेवकवर्ग




प्राचार्यांच्या समवेत संपादक मंडळ



भावपूर्ण निरोप समारंभ प्रसंगी मनोगत व्यक्त करतांना प्राचार्य ई.जी.निकम

# कर्मवीर जयंती




प्रा.एन.डी.पाटील मार्गदर्शन करतांना



प्रा.एन.डी.पाटील यांच्या शुभहस्ते इमारतीचा कोनशिला समारंभ संपन्न होत असतांना, समवेत बॅ.पी.जी.पाटील

केल्याने देशाटन : शैक्षणिक सहल




ऐतिहासिक जंजिऱ्याच्या सान्निध्यात




हरिहरेश्वर येथील सागर दर्शन

राष्ट्रीय सेवा योजना : श्रमसंस्कार शिबीर – पेर्ले



शिबिरार्थींचे श्रमदान



प्राचार्य आर.डी.गायकवाड शिबिरार्थींना मार्गदर्शन करतांना



कु.संगीता प्रतापराव घोरपडे
राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती



कु.मनीषा शामराव कदम
शिवाजी विद्यापीठ–बी.ए.परीक्षेत
द्वितीय क्रमांक (एप्रिल १९९२)



प्राचार्य, प्राध्यापक व बी.ए.भाग ३ च्या विद्यार्थीनी

॥ स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद ॥
पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील



रयत शिक्षण संस्थेचे
महिला महविद्यालय, उंब्रज

# त्रिवेणी

## मराठी विभाग

माझा मऱ्हाठिचा बोलु कौतुके।
परि अमृतातेहि पैजा जिंके।
ऐसी अक्षरे रसिके॥ मेळवीन॥
— संत ज्ञानेश्वर

विभागीय संपादक : प्रा. शिवाजीराव डी. भोसले

# अनुक्रमणिका

## गद्य विभाग


| | | |
|---|---|---|
| १. मना सज्जना | - | कु.लताताई माने/७ |
| २. प्रेम द्यावे प्रेम घ्यावे | - | कु.आसावरी गुजर/९ |
| ३. भारतीय चित्रपट तारक की मारक | - | कु.अपर्णा गणपुले/११ |
| ४. एडस् (Aids) | - | कु.प्रमिला जाधव/१३ |
| ५. राष्ट्रीय एकात्मता-एक चिंतन | - | कु.अंजना गदिया/१६ |
| ६. बहुजनांचे कर्मवीर अण्णा | - | कु.शुभांगी कोरे/१९ |
| ७. वृत्तपत्रे लोकशाहीचे प्रभावी साधन | - | कु.बेबीताई माने/२२ |
| ८. स्त्री मुक्ती काळाची गरज | - | कु.योगिता भस्मे/२४ |
| ९. महागाईचा राक्षस करतो आयुष्याची उजाड राने | - | कु.ललिता उबाळे/२६ |



## काव्य सुमने


| | | |
|---|---|---|
| १. मग मी होणार कवी कशी ? | - | कु.मंदाकिनी मदने/१२ |
| २. आई | - | कु.सविता जाधव/१२ |
| ३. तू काय करशील ? | - | कु.बेबीताई माने/८ |
| ४. अश्रू | - | कु.सीमा दुधाणे/८ |
| ५. आई वडिलांना विसरू नका | - | कु.स्नेहलता देडगे/१८ |
| ६. बांगड्या | - | कु.मंदाकिनी मदने/२३ |
| ७. गुलाबपक्षी | - | कु.आसावरी गुजर/२१ |
| ८. भावना | - | कु.सुवर्णा कुंभार/२१ |
| ९. प्रवास | - | कु. सुधा कुलकर्णी/१५ |


❑ ❑ ❑ ❑

# मना सज्जना


कु. लताताई माने
बी.ए.भाग-३

"म्हणोनि मन एक निश्चळ राहेल। मग आम्हासि साम्य होईल। हे विशेषही न घडेल। याचि लागी॥"

परमार्थ काय अगर व्यवहार काय दोहोतही मनाच्या एकाग्रतेची नितांत आवश्यकता आहे. निश्चल मनाचे सामर्थ्य अमाप असू शकते. म्हणूनच परमार्थात मनोजयाला अतिशय महत्व दिले आहे. सहाव्या अध्यायात भगवंतांनी पातंजल योगाच्या केलेल्या धावत्या उल्लेखावरुन माऊलींनी कुंडलिनी शक्तीवर विस्तृत विवेचन केलेले आहे. मनोजय प्राप्त करण्यासाठी असलेल्या अनेक साधनापैकी प्राणजय आणि अष्टांग योगसाधना सांगितली आहे. त्यातील यम, नियम, आसन, प्राणायम किंवा खेचरी सारख्या अवघड मुद्रा याबाबतची माहिती ऐकल्यावर साहजिकच हा मार्ग अतिशय कठीण असून त्यात आपला अधिकार आहे की नाही ही पहिली शंका अर्जुनाने भगवंताला विचारली. वास्तविक द्वापार युगातील अर्जुनाला जर ही शंका तर आजकालच्या तुमच्या आमच्या सारख्यांची काय अवस्था ?

योगसाधनेच्या योग्यते बद्दलच्या अर्जुनाच्या या शंकेचे समाधान करताना भगवंत बोलले की," कोणत्याही क्षेत्रात योग्यतेच्या उत्पत्तीच अशा काही खाणी नसतात. ती योग्यता प्राप्त करून घेत असताना अर्जुना "अति तेथे माती" हे सूत्र लक्षात ठेव म्हणजे झाले."

खाणे, पिणे, जागणे, झोपणे, विषयाचा भोग घेणे किंवा त्याग करणे इ. सर्वच बाबतीत एकदम टोकाला न जाणे एवढे पथ्य सांभाळले की मग-

'म्हणे सांगे योगासारखे। काही आहे?' असे करीत असताना स्वभावतःच विषयाकडे धावणाऱ्या इंद्रियांना मात्र आवरुन धरावे लागते व ही गोष्ट तशी कष्टदायक आहे हे मान्य करून भगवंतांनी पुन्हा अर्जुनाला दुसरा साम्यावस्थेचा उपाय सांगितला आहे. सर्वत्र भगवंत पाहणे ही साम्यावस्था अंगी बाणल्यावर मग सुख-दुःख, राग- द्वेष, हेवा-दावा हे विकार मनामध्ये येणार नाहीत आणि अशी ही साम्यावस्था ज्याला प्राप्त झाली तोच खरा भाग्यवान! तेव्हा अर्जुना आपणपां विश्व देखिजे। आणि आपण विश्व होईजे। ऐसे साम्यचि एक उपासिजे। पांडवा गा॥'

साम्यावस्थेचा हा दुसरा उपाय ऐकल्यावर अर्जुनाचे समाधान झालेले आहे. तो म्हणतो," देवा हे सगळे खरे. परंतु ही साम्यावस्था येण्यासाठी मुळात मन निश्चल असणे अत्यंत गरजेचे आहे. आणि मन तर एखाद्या माकडासारखे कायमचेच अस्थिर आहे. अशा परिस्थितीत हे मन निश्चल होईल आणि मग आम्हाला साम्यावस्था प्राप्त होईल. हे कसे काय घडणार ?"

मन, बुद्धी, चित्त आणि अहंकार असे एकाच अंत:करणाचे चार परिणाम असून त्यातील संकल्प विकल्पात्मक परिणामास मन म्हटले जाते. या संकल्प-विकल्पामुळे आणि रजोगुणामुळे हे कधी स्थिर राहू शकत नाही. असा विचार मांडताना माऊली म्हणतात की, ——

तेथ चांचल्य निखळ। एकले ठेले निढाळ।
म्हणोनि रजाचे मळ। धरिले तेणे॥

असे हे मन निश्चयात्मक असलेल्या बुद्धीलादेखील राळो की पळो करुन सोडते. एखादी गोष्ट पुन्हः पुन्हा करणे याचा अर्थ अभ्यास असून मनाला जर सतत भगवंताची गोडी दाखविली तर ते विषयाकडे धावणार नाही. मनाची धाव संपली तर जीवाला सुख प्राप्त होईल. याच आशयाने संत तुकाराम म्हणतात -

''आता कोठे धावे मन। तुझे चरण देखिलिया॥
भाग गेला शीण गेला। अवघा झाला आनंद॥

अभ्यास हा सुरवातीस प्रयत्नपूर्वक करावा लागतो. लग्न म्हणजे काय हे न समजण्याच्याच वयात पूर्वीच्या काळी मुलींची लग्ने होत असत. त्यामुळे या मुली सासरी जायला अतिशय नाखुष असत. म्हणून त्यांना सासरची गोडी लागावी यासाठी त्यांना सासरी नेण्यासाठी आलेली सासू निरनिराळे गोड गोड पदार्थ, खेळणी, कपडे वगैरे घेऊन येत असे. तरीही त्यांना जबरदस्तीने सासरी पाठवावे लागत असे. पुढे त्या मुली सासरी इतक्या रमून जात असत की माहेरचे कोणी आजारी पडले म्हणून त्यांना भेटावयास आलेली माहेरवाशीण थोडा वेळ थांबून चटकन परत जायला निघते ''बाई ग! आल्यासरशी दोन दिवस थांब की'' असा जरी तीला आग्रह केला तरी ''त्याच्या जेवणाची आबाळ होईल'' अशी सबब सांगून ती तेथून काढता पाय घेते. हा अभ्यासामुळे निर्माण झालेल्या गोडीचा परिणाम होय. सुरुवातीस मनाला भगवंताकडे बळेच ओढून आणताना म्हणावे की -

मना एक करी। म्हणे मी जाईन पंढरी।
उभा विठेवरी। तो पाहेन सांवळा।

नंतर मग आपोआपच आपणास असा अनुभव येईल -

मन हे राम झाले, मन हे राम झाले।
प्रवृत्ती ग्रासूनि कैसी निवृत्तीशी आले॥

वास्तव मनाला स्थिर करण्यासाठी आवर्जुन भगवंताचे भजन करणे आवश्यक आहे. पोकळ चर्चा करुन अगर फालतू पुस्तके वाचून किंवा अनिष्ट ड्रग्ज सेवन करुन मन कधीच शांत होणार नाही आणि -

''जेथ शांतीचा जिव्हाळा नाही।
तेथ सुख विसरोनि न रिघे काही॥''

❑ ❑ ❑ ❑

## तू काय करशील ?

जे मला तू द्यायचे होतेस ते तर मला दिले नाहीस
तुला जे हवं होतं ते तुला मिळाले नाही
भेटण्याचे वचन तू मला जिथे दिलेस
तिथे तू मला पुन्हा भेटला नाहीस
आता तू काय करशील ?
माझ्यावर चार ओळी कोर
जसा पहाटेच्या वेळी नाचतो मोर
असा जीवाला लावू नको घोर
मी आहे तुझ्या प्रीतीची चोर

कु. माने बी.एस. बी.ए.भाग-१

## अश्रू


ढाळू नकोस अश्रू पुसणार नाही कोणी
दु:खात साथ देणार नाही कोणी
जीवनास फुलविण्याचे मार्ग जरी खुंटले
तरी साथ देण्यास मिळणार नाही कोणी
मिटती ना भाग्यरेषा वाहुनी अश्रुंना
सुटती ना भोग असे भिऊनी यातनांना
स्वार्थी या जगात देवही भुकेला
पदरात दान तुझ्या, देणार नाही कोणी
ही हाक यातनेची ऐकणार नाही कोणी
दु:खात साथ देण्यास असणार नाही कोणी.


कु. सीमा दुधाणे., बी.ए.भाग-१



# प्रेम घावे प्रेम घ्यावे

कु. आसावरी गुजर
बी.ए.भाग-३





'खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे' असा दिव्य संदेश साने गुरुजींनी आपणास दिला. कारण प्रेम ही परमेश्वराकडून मानवाला मिळालेली अतुलनीय देणगी आहे. आणि त्या देणगीचा मानवाने स्वीकार केला पाहिजे. कारण प्रेम हे कधीही लोप पावणारे नाही. ती एक प्रकारची प्रेरणादायी संजीवनी आहे. माणसाने उभ्या केलेल्या विविधांगी संस्कृतीचा 'सारांश' प्रेम आहे. हे प्रेम स्त्री-पुरुषांपुरते मर्यादित नाही, तर ती एक व्यापक जीवनवृत्ती आहे. हे प्रेमच मानवाचा अभ्युदय घडवून आणू शकेल. म्हणूनच या प्रेमाचा वसा माणसाने घेतला नाही, तर माणसाचं नातं तुटेल. म्हणूनच प्रेम हे कुणावरही करावं. ते अपूर्ण जीवनास पूर्णत्व बहाल करणारे आहे.

प्रेम ही भावनाच उदात्त आणि भव्य अशी आहे. विश्वाला व्यापून टाकणारी आहे. मानवतेची जाणीव करुन देणारी आहे आणि म्हणूनच खरं प्रेम जात-पात, धर्म-पंथ, सुंदर-कुरुप काहीच बघत नाही. वालीव भिन्नता ते पहात नाही. जे प्रेम भेदभाव मानून केलं जातं ते खरं प्रेम नव्हेच. कारण प्रेमात बंधुभावाची भावना असते.

प्रेमाचे भरले वारे। माऊ हे झाले सारे।

जगातील सारी माणसे माझी भावंडेच नाहीत का अशी विश्वबंधुत्वाची भावना प्रेमात असली पाहिजे. आपली भारतीय संस्कृती मानवतावादी संस्कृती आहे, सर्वांना सामावून घेणारी, सर्वांशी बंधुत्वाने वागा अशी शिकवण देणारी संस्कृती आहे. पण आज चित्र उलट दिसत आहे. येथे प्रेम पिकत नाही, बंधुभाव पिकत नाही, ही पिके आता दुर्मिळ झाली आहेत. जाती-जातीतील हेवेदावे वाढत आहेत. जातीय ऐक्याची कल्पनाही इथे सहन होत नाही. अर्थात जेथे अहं जागृत असतो तेथे प्रेम निर्माण होत नाही. जेथे अभिमान आहे तेथे प्रेमाला कोठून वाव मिळणार? प्रेम म्हणजे निरहंकारता, प्रेम म्हणजे स्वत:चे मरण, स्वत:चे विस्मरण. प्रेमाला स्वत:ला शून्य करणे आवडते, पण आमची प्रेमनिष्ठा आम्ही दगडातल्या देवाला वाहतो. माणसातल्या सगुण देवाला नाही. म्हणूनच तर दगडालाही भावना असतात असे आपण ठरविले आहे. दगडाच्या न बोलत्या देवाला मोदक आवडतात की लोणीसाखर आवडते हे आपण ठरविले, परंतु आजूबाजूला लाखो बोलणारे चैतन्यमय देव आहेत त्यांना दुपारी नैवेद्य मिळाला की नाही याची मात्र दखल आपण घेत नाही. दगडाच्या देवाला सोन्याचांदीचे मुकुट आहेत, त्याच्या कासेला पितांबराची घटी आहे परंतु सभोवतालच्या लाखो बंधूंना थंडीच्या दिवसात अंगाला अंगभर वस्त्र नाही. काय ही मूर्तिपूजा! परमेश्वराला ऐकीकडे आपण माता म्हणतो व दुसरीकडे त्याच्या लाखो लेकरांना लाथा मारतो हे योग्य आहे का? साऱ्या भावांनी प्रेमाने परस्परांची काळजी वहात

एकत्र नांदणे यातच मातेची खरी पूजा असते. हे जग त्या एकाच ईश्वराने निर्माण केले आहे व आपण त्याची लेकरे आहोत म्हणून आपआपसातील भेदाभेदाच्या भ्रमाचे मायाजाल आपणच दूर केले पाहिजे.

म्हणूनच प्रेम सुंदरावर करावं, त्याप्रमाणेच कुरुपावरही करावं, ते लावण्यावर करावं तसंच कारुण्यावरही करावं. याचा अर्थ जेथे काही उणीव आहे, अपूर्णता आहे ती अपाण समजावून घ्यावी. दुसऱ्याची भूमिका, त्याची अगतिकता आपण समजावून घ्यावी. दीन-दुबळ्यांकडे, अपंगाकडे दयाबुद्धीने, प्रेमाने व बंधुतेने पहावे. संतांची शिकवणही आपणास दुसरे काय सांगते ?

जे का रंजले गांजले। त्यासी म्हणे जो आपुले।
तोचि साधु ओळखावा। देव तेथेची जाणावा॥

जे दुःखाने, आपत्तीने गांजले आहेत. त्यांना सहानुभूती दिली पाहिजे. त्यांच्या दुःखाशी एकरुप होता आले पाहिजे. दुसऱ्याच्या दुःखात तसेच आनंदातही सहभागी होता आले पाहिजे, कारण दुसऱ्याच्या सुखात, आनंदातही आम्हाला नीट सहभागी होता येत नाही. दुसऱ्याला झालेला आनंद आम्हाला रुचत नाही इतकी आमची वृत्ती संकुचित झालेली आहे. पण तिरस्कार, द्वेष, सूड या आयुष्यातील गांधीलमाशा आहेत. तर प्रेम ही एक प्रेरणादायी संजीवनी आहे. मग यातील काय स्वीकारायचे हे आपण ठरविले पाहिजे. पण ''हृदयातील सद्भाव व सत्प्रेम हीच आपली शिदोरी. सदिच्छा व मंगल आशिर्वाद हीच आपली साधने. बाहेरचे तुकडे व चिंध्या किती दिवस पुरणार ?'' कारण या देहाची शेवटी मातीच होणार आहे या देहाच्या पिंजऱ्यात जोवर प्राण आहे, तोपर्यंत तरी त्याचा चांगल्या कार्यासाठी, दुसऱ्याच्या हितासाठी उपयोग केला पाहिजे. कारण -

''जिना भला है उसका जो दुसरोंके लिए जिए।
मरना भला है उसका जो खुद के लिए जिए।''

म्हणून मनात सतत परोपकाराची भावना असावी. पण यासाठी आपल्या अहंकाराला मूठमाती दिली पाहिजे. आपण जे काही चांगले कार्य करत आहोत ते ईश्वराचेच कार्य आहे असे समजून ते कार्य अविरत चालू ठेवले पाहिजे. दीन-दुबळ्यांना मदत करताना उपकारकर्त्याची भावना नसावी.

या प्रेमासाठी कोणताही त्याग करण्याची सतत तयारी असली पाहिजे. कारण प्रेम केलं तर ते सर्वस्व झोकून करावं. म्हणूनच योग आणि भोग यापेक्षा त्याग श्रेष्ठ. म्हणून त्यागावर प्रेम करायला शिकलं पाहिजे. कारण त्याग हीच प्रेमाची कसोटी आहे. ''प्रेम लाभे प्रेमळाला, त्याग ही त्याची कसोटी.'' म्हणूनच त्यागाशिवाय प्रेम नाही व प्रेमाशिवाय त्याग नाही. प्रेमच आपल्याला त्याग करायला शिकविते. स्वातंत्र्यलढ्यात स्वतःचे सर्वस्व झोकून देणाऱ्या क्रांतीकारकांचे आपल्या देशावर, आपल्या देशबांधवावर, स्वातंत्र्यप्राप्तीच्या ध्येयावर निस्सीम प्रेम होते, म्हणूनच त्यांनी हसत हसत मरणाशी सामना दिला.


''प्रेम ही विशाल जीवनदृष्टी आहे. म्हणूनच आपल्या मातृभूमीवर, देशबांधवावर, निसर्गावर, सर्व प्राणिमात्रावरही प्रेम करुन ''हे विश्वचि माझे घर'' असे म्हटले पाहिजे. जगातील फक्त प्रेम हीच गोष्ट सत्य पण सुंदर असते. ''सुख पाहता जवापाडे दुःख पर्वताएवढे'' या जीवनाला प्रेमामुळे अर्थ निर्माण होतो. त्याला काहीतरी मोल निर्माण होते. म्हणूनच, ''दोन दिवस जगात रहावयाचे आहे. हसावे, खेळावे, प्रेम लुटावे, आनंद निर्माण करावा.'' आपल्याला सर्व संसार मधुर करुन घ्यावयाचा असेल तर सर्वत्र प्रेम करावे. आपल्या आत्म्याचे माधुर्य सर्वत्र ओतीत जावे.

❑ ❑ ❑ ❑



## ''भारतीय चित्रपट तारक की मारक''

कु.अपर्णा रमेश गणपुले
बी.ए.भाग-३




आजच्या विसाव्या शतकाच्या या शेवटच्या दशकामध्ये मनोरंजनाचे सर्वात प्रभावी साधन म्हणजे 'चित्रपट' आजच्या चित्रपटांकडे पाहिल्यास मनामध्ये खरोखर प्रश्न उभा राहतो. आजचे चित्रपट लोकशिक्षण साधू शकतील का? दूरदर्शनच्या पाठोपाठ घरामध्ये आता व्ही.सी.आर. चे प्रमाण वाढले आहे. जर घरी व्ही.सी.आर.नसेल तर बाहेरील व्हिडिओ पार्लर्समध्ये जाऊन मंडळी चित्रपट पाहतात.

चित्रपटांमध्ये समाजाचे प्रतिबिंब उमटते. समाजामध्ये घडणाऱ्या गोष्टी चित्रपटांमध्ये पाहावयास मिळतात. मानवास ज्या गोष्टी चित्रपटांमध्ये पाहावयास मिळतात. मानवास ज्या गोष्टी पहावयास मिळतात त्या गोष्टी ऐकीव गोष्टींपेक्षा त्याच्या स्मरणात राहतात. त्यामुळे चित्रपटातील गोष्टींचे अनुकरण केले जाते. मग ती गोष्ट चांगली असो वा वाईट, ज्याला जे आवडेल ते तो उचलतो. नायक, नायिका आणि खलनायक यांचे अनुकरण तरुणपिढी करत आहे. नायक अथवा नायिकेची वेषभूषा, केशभूषा, प्रवृत्ती याकडे आकर्षित होत आहे.

या प्रभावी माध्यमाचा शिक्षणासाठी उपयोग होऊ शकेल का? लोकसंख्या, प्रदुषण यासारख्या समाजाला भेडसावणाऱ्या समस्यांचे धोके जर माहिती पटाद्वारे लोकांपर्यंत पोहोचले तर ते एक समाजप्रबोधनाचे प्रभावी माध्यम म्हणून उपयुक्त ठरेल. आपल्या समाजात बहुसंख्य लोक निरक्षर आहेत. त्यांचे विचार रुढिप्रिय, धर्मभोळे आहेत. त्यांचे प्रबोधन फक्त सभा, व्याख्याने, प्रवचने यातून होणार नाही. तर त्यासाठी चित्रपट या लोकप्रिय माध्यमाचा उपयोगकरुन साक्षरता प्रसार करण्यास काहीच हरकत नाही. हे काम 'अंगुठाछाप' सारखा चित्रपट प्रभावीपणे करु शकेल. हुंड्याची समस्या मांडणारे 'लेक चालली सासरला' 'पुढचं पाऊल' यासारखे मराठी चित्रपट घ्या किंवा 'बहुरानी' सारखा हिंदी चित्रपट, निश्चितच ही जटील समस्या सोडविण्यासाठी प्रभावी ठरतील. स्वातंत्र्यपूर्व काळात लोकांनी केलेले बलिदान चित्रपटातून पाहिल्यावर तरुण मनामध्ये देशभक्तीची भावना निर्माण होते. लहान मुलांनी केलेल्या पराक्रमाची प्रेरणा चित्रपट पाहणाऱ्या मुलांना निश्चितच मिळेल. 'रोजा' सारख्या चित्रपटात काश्मिरी अतिरेक्यांशी एकाकी भावनिक संघर्ष करणाऱ्या नायकाचे चित्तथरारक चित्रण आकर्षकपणे करुन तरुणांना प्रेरणा मिळाली आहे. 'हिंदुस्थानी नाम हमारा है' या देशभक्तीपर गीतातून या चित्रपटाने राष्ट्रीय वृत्ती जोपासण्याचे कार्य केले आहे.

आजच्या काळाचा विचार करता दर आठवड्याला एक चित्रपट प्रसिध्द होतो. पण या चित्रपटांत काय दृश्ये दिसतात? चोरटा व्यापार, जकपक पोषाखातील नायक- नायिका, व्यसनाधीन तरुण, हिंसा, मारामारी, जाळपोळ, अनैतिक गोष्टी, अचकट विचकट हावभावाची

नृत्ये या गोष्टींना अवास्तव महत्त्व देऊन निर्मात चित्रपटांचा धंदा करतात. असे चित्रपट त्यांना पैसा मिळवून देतात. पण समाजावर अनिष्ट परिणाम होतात. मग चित्रपट हा तारक कसा? चित्रपटातील नायक नायिकांचे प्रेम, त्यांचे एकमेकांसाठी मरणे, एवढ्याच गोष्टी आजचा तरुण आत्मसात करतो. त्याचा परिणाम म्हणून सडकसख्याहरींचा सुळसुळाट, एकतर्फी प्रेमप्रकरणे असले प्रश्न समाजास भेडसावतात. आणि मग गल्लीबोळात जान्हवी आणि रिंकू यांच्यासारख्या कळ्या अकाली खुडल्या जातात. प्रसन्न आणि हरीश यांसारखे मूर्ख प्रेमवीर निर्माण होतात. चित्रपटातील गाण्यातील किळसवाण्या ओळी रस्त्याने गुणगुणत बघणाऱ्या मुलींच्या, छेड काढल्या जातात.

तरुणांचा संयम नष्ट झाला आहे. घरी व्ही.सी.आर. बघत लहान मुले खेळाचे मैदान विसरली व तासन् तास चित्रपट पाहण्यात रंगून गेली आहेत. हा चित्रपट मारक न होता तारक ठरविण्याची गरज निर्माण झाली आहे.

ज्या त्या भाषेला अभिमान वाटेल असे साहित्य त्या त्या भाषेत असते. त्याचे दृकस्वरूप चित्रपटाच्याद्वारे लोकांसमोर आले तर ते समाजप्रबोधनाचे काम करेल. चित्रपटरूपी शिवधनुष्य उचलण्यास प्रभु रामचंद्रांच्या सामर्थ्याची गरज आहे. हे सामर्थ्य ज्यांच्याकडे आहे ते समाजप्रबोधनाचे काम निश्चितच चित्रपटाद्वारे समर्थपणे करून दाखवतील.

❑ ❑ ❑ ❑

## मग मी होणार कवी कशी?

मी आहे एक सामान्य व्यक्ती
कवी कसा असतो मी समजणार कशी?
शब्दांच्या धबधब्यावर बसणार कशी
मग मी होणार कवी कशी?
सकाळी उठल्यापासून कॉलेजला जाणे
सेमिनारवर मन लावून गप्पा मारणे
घरी गेल्यावर रेडिओ ऐकणे, टिव्ही पहाणे
घर कामात [illegible] पहावे कस बरी
मग मी होणार कवी कशी?
साहित्यिक म्हणतात कवी होण्यासाठी व्यासंग
हवा
मला लागतो वाचण्यासाठी नेहमी विषय नवा
नाही हे ठरलेले नेहमीचे कामगिरी अशी
मग मी होणार कवी कशी?

कु. मदने एम. यू.
बी.ए.भाग-२

## आई


माझ्या आईचा सोन्यावाणी रंग ग।
हिचा मोत्यांनी भरा भांग
नेसली शालू आणि चोळी
कर्णफुले, पायी मासोळी
लाल शालूचा मळक रंग
हिचा मोत्यांनी भरला भांग
दागदागिने आईला घालू
आईला पाहून आनंदे डोलू
आईच्या मजलात हीक आम्ही दंग
आईच्या मुखात रंगतात विडे
आईच्या हातात हिरवे चुडे
हिला बसायला चौपाळा पलंग
हिच्या नथीत हिरवे खडे
केवड पदराची प्रभा पडरंग
हरी म्हणे, काऊ गाणी
माझ्या माहुरी गडाची ही राणी
हिच्या तेजाने देव झाले दंग
माझ्या आईचा सोन्यावाणी रंग
हिचा मोत्यांनी भरा भांग

कु. सविता गुलाबराव जाधव, बी.ए.भाग-२



## 'एड्स'

कु. जाधव पी. आर.
बी.ए.भाग-२



वैद्यकशास्त्रात झालेल्या प्रगतीमुळे आपण अनेक रोगांवर मात करू शकलो आहोत "देवी" किंवा "प्लेग" सारखे रोग काळाच्या पडद्याआड गेले "कुष्ठरोग", "पोलीओ", "डांग्या खोकला" यासारख्या अनेक संसर्गजन्य रोगांचे प्रमाण कमी करण्यात आपण यशस्वी झाले. सर्व स्तरावरचे प्रयत्न असेच चालू राहिले तर कालांतराने असंख्य रोग हे नामशेषच राहतील.

परंतु नवीन रोगांच्या उद्भवामुळे हे चक्र न संपणारे सुरूच आहे, एखाद्या रोगाची माहिती होणे, त्यावर उपाय शोधणे, त्या रोगास हटविणे हे तेवढ्यापुरतेच मर्यादित राहत नाही. हे एक दुष्टचक्र आहे म्हणा ना?

वैद्यक शास्त्राला आव्हान देणारा 'एड्स' हा असाच एक दुर्धर रोग. १९८१ साली या रोगाचा शोध लागला. पण अवघ्या १० वर्षांत पाश्चिमात्य देशात या रोगाने गंभीर स्वरूप धारण केले आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे हा रोग झाला तर त्याच्यावर कोणतेही औषध नाही. त्यामुळे या रोगाचे रूप मोठ्या प्रमाणात वाढत दिसून येत.

**'एड्स' म्हणजे काय?**

'एड्स' म्हणजे प्रतिकार शक्तीच्या कमतरतेमुळे शरीरात दिसून येणारी विविध लक्षणे. 'एड्स' हा HIV नावाच्या विषाणूमुळे होतो. हा विषाणू हळूहळू माणसाची नैसर्गिक प्रतिकार शक्ती नष्ट करतो व त्यामुळे साध्या रोगाला तो बळी पडू शकतो.

**अधिशयन काळ**

एड्सच्या विषाणूचा शरीरात प्रवेश झाल्यापासून रोगाची लक्षणे (Symptoms) दिसू लागेपर्यंतच्या कालावधीला एड्सचा अधिशयन काळ म्हणतात. संशोधनानुसार हा कालावधी ५ ते ८ वर्षांपर्यंत आहे. 'HIV' विषाणूची लागण होणे आणि एड्सचा रोगी होणे या दोन्हीच्या अवस्था आहेत, परंतु 'HIV' ची लागण झालेली व्यक्ती बाहेरून निरोगी दिसली तरी रोग प्रसार करू शकते. अर्थात अशा व्यक्तीने लैंगिक बाबतीत घेतलेल्या दक्षतेमुळे त्याच्यापासून काहीही धोका नसतो.

'HIV' ने शरीरात प्रवेश केल्यानंतर तो पांढऱ्या पेशींशी (White Blood corpuscles) वरती हल्ला चढवितात. पांढऱ्या पेशी प्रतिकार शक्ती निर्माण करण्याचे कार्य करतात. एड्सच्या विषाणूमुळे शरीराची रोग प्रतिकार क्षमता (Rebel capasity) हळूहळू कोलमडून पडते व कोणताही धातु संसर्ग झाल्यास तो गंभीर स्वरूप धारण करतो.

**एड्सची लक्षणे**

"एड्स" हा एक विशिष्ट रोग नसून तो विविध आजारातील लक्षणांचा समूह (syndrome) आहे.

नृत्ये या गोष्टींना अवास्तव महत्व देऊन निर्माते चित्रपटांचा धंदा करतात. असे चित्रपट त्यांना पैसा मिळवून देतात. पण समाजावर अनिष्ट परिणाम होतात. मग चित्रपट हा तारक कसा? चित्रपटातील नायक नायिकांचे प्रेम, त्यांचे एकमेकांसाठी मरणे, एवढ्याच गोष्टी आजचा तरुण आत्मसात करतो. त्याचा परिणाम म्हणून सडकसख्याहरींचा सुळसुळाट, एकतर्फी प्रेमप्रकरणे असले प्रश्न समाजास भेडसावतात. आणि मग गल्लीबोळात जान्हवी आणि रिंकू यांच्यासारख्या कळ्या अकाली खुडल्या जातात. प्रसन्न आणि हरीश यांसारखे मूर्ख प्रेमवीर निर्माण होतात. चित्रपटातील गाण्यातील किळसवाण्या ओळी रस्त्याने गुणगुणत बायकांच्या मुलींच्या, छेड काढल्या जातात. तरुणांचा संयम नष्ट झाला आहे. घरी व्ही.सी.आर बघत लहान मुले खेळाचे मैदान विसरली व तासन् तास चित्रपट पाहण्यात रंगून गेली आहेत. हा चित्रपट मारक न होता तारक ठरविण्याची गरज निर्माण झाली आहे.

ज्या त्या भाषेला अभिमान वाटेल असे साहित्य त्या त्या भाषेत असते. त्याचे दृकस्वरुप चित्रपटाच्याद्वारे लोकांसमोर आले तर ते समाजप्रबोधनाचे काम करेल. चित्रपटरुपी शिवधनुष्य उचलण्यारा प्रभु रामचंद्रांच्या सामर्थ्याची गरज आहे. हे सामर्थ्य ज्यांच्याकडे आहे ते समाजप्रबोधनाचे काम निश्चितच चित्रपटाद्वारे सामर्थपणे करुन दाखवतील.

❑ ❑ ❑ ❑

## मग मी होणार कवी कशी ?

मी आहे एक सामान्य अशी
कवी कसा असतो मी समजणार कशी?
शेवटच्या बाकावर बसणार अशी
मग मी होणार कवी कशी?
सकाळी आटोपून कॉलेजला जाणे
मैत्रिणींबरोबर भरपूर गप्पा मारणे
घरी गेल्यावर रेडिओ ऐकणे, टिव्ही पहाणे
चार वाजता वाजणार चहाची कप बशी
मग मी होणार कवी कशी?
सगळेजण म्हणतात कवी होण्यासाठी व्यासंग हवा
मला लागतो गप्पांसाठी नेहमी विषय नवा
माझी ही ठरलेली नेहमीची रोजनिशी अशी
मग मी होणार कवी कशी?

कु. मदने एम. यू.
बी.ए.भाग-२

## आई


माझ्या आईचा सोन्यावाणी रंग ग।
हिचा मोत्यांनी भरा भांग
नेसली शालू आणि चोळी
कर्णफुले, पायी मासोळी
लाल शालूचा भडक रंग
हिचा मोत्यांनी भरला भांग
दागदागिने आईला घालू
आईला पाहून आनंदे डोलू
आईच्या भजनात होऊ आम्ही दंग
आईच्या मुखात रंगतात विडे
आईच्या हातात हिरवे चूडे
हिला बसायाला चोपाळा पलंग
हिच्या नथीत हिरवे खडे
कंब्बर पट्ट्याची प्रभा नवरंग
हरी म्हणे, गाऊ गाणी
माझ्या माहूरी गडाची ही राणी
हिच्या तेजाने देव झाले दंग
माझ्या आईचा सोन्यावानी रंग
हिचा मोत्यांनी भरा भांग

कु. सविता गुलाबराव जाधव, बी.ए.भाग-२



## 'एड्स'

कु. जाधव पी.आर.
बी.ए.भाग-२



वैद्यकशास्त्रात झालेल्या प्रगतीमुळे आपण अनेक रोगावर मात करु शकलो आहोत "देवी" किंवा "प्लेग" सारखे रोग काळाच्या पडद्याआड गेले "कुष्टरोग", "पोलीओ", "डांग्या खोकला" यासारख्या अनेक संसर्गजन्य रोगाचे प्रमाण कमी करण्यात आपण यशस्वी झालो. सर्व स्तरावरचे प्रयत्न असेच चालू राहिले तर कालांतराने असंख्य रोग हे नावापुरतेच राहतील.

परंतु नवीन रोगांच्या उद्भवामुळे हे चक्र न संपता सुरुच आहे, एखाद्या रोगाची माहिती होणे, त्यावर उपाय शोधने, त्या रोगास हटविणे हे तेवढ्यापुरतेच मर्यादित राहात नाही. हे एक दुष्टचक्रच आहे म्हणा ना?

वैद्यक शास्त्राला आव्हान देणारा 'एड्स' हा असाच एक दुर्धर रोग. १९८१ साली या रोगाचा शोध लागला. पण अवघ्या १० वर्षात पाश्चिमात्य देशात या रोगाने गंभीर स्वरुप धारण केले आहे, सर्वात महत्वाचे म्हणजे हा रोग आता त्या देशापुरताच मर्यादित राहिलेला नाही. सध्या या रोगाचे रुग्ण मोठ्या प्रमाणात भारतात दिसून येतात.

### 'एड्स' म्हणजे काय ?

'एड्स' म्हणजे प्रतिकार शक्तिच्या कमतरतेमुळे शरीरात दिसून येणारी विविध लक्षणे. 'एड्स' हा 'HIV' नावाच्या विषाणुमुळे होतो हा विषाणु हळुहळु मानवाची नैसर्गिक प्रतिकार शक्ति नष्ट करतो व यामुळे साध्या साध्या रोगांना तो बळी पडू शकतो.

### अधीशयन काळ

एड्सच्या विषाणुचा शरीरात प्रवेश झाल्यापासून रोगाची लक्षणे (Symtoms) दिसू लागे पर्यंतच्या कलावधीस एड्साचा अधीशयन काळ म्हणतात. सर्वसाधारणपणे हा कालवधी ५ ते ८ वर्षापर्यंत आहे. 'HIV' विषाणूची लागण होणे आणि एड्साचा रोगी होणे या वेगवेगळ्या अवस्था आहेत, परंतु 'HIV' ची लागण झालेली व्यक्ती बाह्यतः निरोगी दिसली तरी रोग प्रसार करु शकते. अर्थात अशा व्यक्तिने ठराविक काळजी घेतल्यास इतरांना त्याच्यापासून काहीही धोका नसतो.

'HIV' ने शरीरात प्रवेश केल्यानंतर ते पांढऱ्या रक्तपेशी (White Blood corpusules) वरती हल्ला चढवितात. पांढऱ्या रक्तपेशीप्रतिकार शक्ती निर्माण करण्याचे कार्य करतात. एड्सच्या विषाणुमुळे शरीराची रोग प्रतिकार क्षमता (Rebel capasity) हळुहळु कोलमडून पडते व कोणताही जंतु संसर्ग झाल्यास तो गंभीर स्वरुप धारण करतो.

### एड्सची लक्षणे

"एड्स"हा एक विशिष्ट रोग नसून तो विविध आजारातील लक्षणांचा समुह (syndrome) आहे.

या रोगामध्ये खालील लक्षणे दिसून येतात.

१) अकारण वजनात घट होणे. (१० %) पेक्षा जास्त.
२) सतत बारीक ताप. रात्रीचा घाम येणे. (एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी)
३) कारण नसताना जुलाब होणे.
४) तोंडात व अन्न नलिकेत चट्टे पडणे.
५) ३ महिन्यापेक्षा जास्त काळ राहणारी लसीका ग्रंथींची सूज.

अशा प्रकारची लक्षणे आढळली तर ती एड्सचीच असतील असे नाही. इतर ज्या आजारामध्ये अशी लक्षणे दिसून येतात त्याचे निदान जर झाले नाही व उपचारांना प्रतिसाद मिळाला नाही तर एड्स बाबत वैद्यकीय सल्ला घेण्यात यावा. एड्स आजार वाढल्यावर न्युमोनिआ, मेंदूज्वर व विविध कॅन्सर दिसून येतात.

### "HIV" संसर्गाचे मार्ग

१) "HIV" विषाणू लागण झालेल्या व्यक्तिच्या रक्त, वीर्य योनीस्त्राव यांच्या संपर्कातून.
२) एड्सच्या विषाणू लागण झालेल्या व्यक्तिसाठी वापरण्यात आलेली सुई किंवा सिरींज निर्जंतूक न करता तशीच निरोगी व्यक्तिस वापरल्यास.
३) एड्सच्या विषाणूची लागण झालेल्या व्यक्तिच्या अश्रूमध्ये, थुंकीमध्ये, घामामध्ये, एड्सग्रस्त मातेच्या दूधामध्ये विषाणू आढळून आले आहेत. परंतु अशा बाबींमुळे एड्स झाल्याचे प्रयोगिक दृष्ट्या सिध्द झालेले नाही.

### आरोग्यरक्षक व एड्स

वैद्यकीय सुविधांना आर्थिक मदत करताना जागतिक बँकेच्या पाहणीत असे आढळून आले आहे की "सार्वजनिक वैद्यकीय सुविधा व खाजगी वैद्यकीय व्यवसाय यामध्ये पर्यायी गोळ्या उपलब्ध असतानाही ३०% इंजेक्शनचा वापर हा अनावश्यक होतो. अपघाताने का होईना पण अशा दूषित सुयांमधून एड्सच्या प्रसारास उत्तेजनच मिळते.

### एड्स निदान

एड्सच्या विषाणूंची लागण झाली किंवा नाही हे पाहण्यासाठी बऱ्याच वैद्यकीय चाचण्या आहेत. परंतु त्यापैकी प्रामुख्याने "इलिसा टेस्ट Elisatest, वेन्टने-ब्लॉट टेस्ट WestneyBloot test या दोन चाचण्या वापरतात.

ब्लड बँकेमध्ये सध्या दोन्ही टेस्ट पेक्षा 'मायक्रो टायटर अग्लूटिनेशन टेस्ट Microtiter Aglutination test वापरण्याकडे कल जास्त दिसून येतो यासाठी संबंधीत उपकरण "फुजिरेबिओ कंपनी, Phujirebio Co जपान" यांनी विकसित केले असून वेळेची बचत व इलिसा टेस्ट पेक्षाही मिळणारे विश्वासणीय रिझल्ट यामुळे ते विशेष लोकप्रिय होत आहे. अधिकृतपणे एड्सची चाचणी ही निवडक ठिकाणीच केली जाते.

### एड्स सदृश विषाणूचा शोध

कॅलिफोर्निया विद्यापीठामध्ये काम करणारे भारतीय शास्त्रज्ञ डॉ. सुधीर गुप्ता व त्यांच्या सहकार्यांनी एड्स सदृश विषाणू (HICRV) शोधून काढला आहे. HICRV म्हणजेच Human Intra Cirternal Retro virus या विषाणुमुळे एड्स सदृश लक्षणे दिसून येतात असा त्यांचा दावा आहे. याचा आकार ८० नॅनोमीटर इतका असून त्यास वाढीसाठी 'मॅगनिज' नावाचे खनिज लागते. HIV चा आकार १२० नॅनोमीटर इतका असून त्यांच्या वाढीसाठी मॅग्नेशियम लागते. हा विषाणू इलिसा टेस्टमध्ये पडू शकत नाही.

### एड्स उपचार

एड्सवर प्रभावी ठरू शकणारी अशी औषधांच्या चाचण्या ठिकठिकाणी सुरू आहेत. (उदा. Poscamel HPA-28 Suramine Azidothymidine etc) तसेच एड्सवर प्रभावी लस उपलब्ध करण्यासाठी जगभरातील अनेक शास्त्रज्ञ अहोरात्र झटत आहेत यापैकी 'इम्युनो आर. जी. पी. १६०" या लसीचे निकाल पुष्कळ आशादायक आहेत.

भारतामध्ये हैद्राबादच्या 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ



केमिकल टेक्नॉलॉजी या संस्थेने एक औषध विकसीत केले असून त्याचे तंत्रज्ञान सिपला कंपनीस देण्यात आले आहे सिपला कंपनीचे औषध लवकर भारतीय बाजारपेठेमध्ये विक्रीसाठी उपलब्ध होईल.

### लैंगिक शिक्षण अत्यंत आवश्यक

१५ ते १८ वर्षे वयोगटातील मुला-मुलींना शालेय अभ्यासक्रमाबरोब लैंगिक शिक्षण देणे अत्यंत आवश्यक आहे. पुढे येणारे टप्पे, विवाह, वैवाहिक समस्या, एड्ससारखे आजार यांच्यापासून संरक्षण म्हणून हे ज्ञान उपयोगी पडणारे आहे. लैंगिक शिक्षणामुळे एड्स रोगाची व्याप्ती कमी करणेस अत्यंत मोलाची मदत होईल.

### एड्स रूग्ण-शारीरिक अवस्थेइतकीच मानसिक अवस्था महत्वाची

एड्सचा रूग्ण तो एड्सग्रस्त असल्याची माहिती कळाल्यावर मनाने खचतो, उध्वस्त होतो. अशावेळी त्याला आवश्यकता असते प्रेमाची व धीर देण्याची. अशा वेळी रूग्णाच्या कसोटीचा क्षण असतो. ठराविक काळजी घेतल्यावर एड्स रूग्ण इतरांसारखेच आपले उर्वरित आयुष्य सुखाने जगू शकतो. मृत्यूशय्येवर खिळलेल्या एड्सग्रस्त किती तुताया (दुगांडा) या प्रसिध्द गायकाने लिहिलेली ही 'अलोन' नावाची सुंदर कविता 'एड्सग्रस्त' रूग्णाचे मनोव्यापार किती समर्थपणे दर्शविते ते पहा——

"Take my hand now
I am Teased and lonely
Give me love
Give me hope
Don't derest me
Don't reject me
All I need is love
And understanding
"Today its me
Tomorrow someone else
Get's come on out
Get's stand together and bight AIDS".

❑ ❑ ❑ ❑

## प्रवास

प्रवासामध्ये वाट संपूच नये असे वाटत होते.
त्याचक्षणी अशा सुंदरवेळी फुलराणीने प्रवासाला
सुरुवात केली

अशा या अमृतमय वातावरणात संध्येनेही
साथ दिली.

संध्येच्या सोबत अंजूनेही प्रवासाला
सुरुवात केली.

असा हा सुंदर योगायोग प्रवासामध्ये घडला
व त्यातच योगिता अवतरली

जयाने आपल्या सुंदर पावलांनी जयमाला
तयार केली.

मेघांची बरसात झाली.

शुभाने आपल्या शुभहस्ते सुवर्णाला
निरोप दिला.

अशातच संगीताची साथ मिळाली.
प्रत्येक जीवाने प्रत्येकीला काहीतरी
अर्पन केले.

प्रत्येकीने एकमेकींचा सुंदर गोड निरोप घेतला.
व या कॉलेजमय विश्वातून प्रवास
करता करता


एक दिवस तो प्रवासच संपला
परंतु या प्रवासाला सीमाच उरली नव्हती.
आता हे स्वप्न पुढे साकार होणार
या विचाराने पुन्हा प्रवासाचे स्वप्न
सुरुच होते

असा हा गोड प्रवास संपणार नाही.

**कु. सुधा कुलकर्णी, बी. ए. भाग - ३**

# राष्ट्रीय एकात्मता - एक चिंतन

कु. अंजना गदिया
बी.ए.भाग-३




भारतीय समाजाला भेडसावणाऱ्या अनेक समस्यांमध्ये राष्ट्रीय एकात्मतेची समस्या ही एक प्रमुख व जटील समस्या आहे. भारतासारख्या खंडप्राय देशात, जेथे अनेक भाषा बोलणारे अनेक धर्मांचे, अनेक पंथांचे व अनेक जातींचे लोक एकत्र राहतात, तेथे एकात्मता साधने किंवा निर्माण करणे अशक्य नसले तरी कठीण आहे.

भारतीय समाजावर जेव्हा जेव्हा संकटे आली तेव्हा, तेव्हा सारे भारतीय एक झाले. १९६२ मध्ये चिनी आक्रमण झाले. दोनदा पाकिस्तानशी युध्दाचा प्रसंग आला. त्या त्या वेळेला काश्मिर पासून कन्याकुमारीपर्यंतच्या व अटक पासून कटक पर्यंतच्या सर्व भारतीयांना ते आपल्यावरचे संकट वाटले व सर्व समाज संघटीतरित्या तोंड देण्याकरता उभा राहिला. बिहारमधील दुष्काळाच्यावेळी किंवा इतर ठिकाणी आकस्मितरित्या आलेल्या नैसर्गिक आपत्तीचे वेळी देखील या समाजाने एकात्मतेचे दर्शन घडविले. बाह्य आक्रमणांच्यावेळी भारतीय समाज एकसंघ वाटत असला तरी सर्वसाधारण परिस्थितीत अनेक कारणांनी या समाजातील वेगवेगळ्या गटात वेगळ्या प्रकारची, दुराव्याची भावना दिसते. तसेच क्षुल्लक समुहहितापुढे राष्ट्रीयहीत दुय्यम ठरलेले दिसते. व म्हणूनच या समस्येचा गांभिर्याने विचार करणे आवश्यक आहे.

## राष्ट्रीय एकात्मतेची संकल्पना

स्वार्थ हा मानवाचा स्थायीभाव आहे. असे असले तरी सामुहिक जीवन जगत असताना तो आपल्या स्वार्थाला मुरड घालत असतो व शेवटी माझ्यापेक्षा, माझ्या कुटुंबापेक्षा, माझ्या गावापेक्षा, माझ्या विभागापेक्षा, माझे राष्ट्र महत्वाचे आहे. राष्ट्रहितातच माझे हित सामावले आहे. अशी भावना विकसित होते. म्हणजेच समाजातील किंवा राष्ट्रातील नागरिक सभासद आपला भाषिक जातीय, धार्मिक, प्रादेशिक गटांच्या मर्यादा ओलांडून राष्ट्रहितास प्राधान्य देतात. आम्ही सर्व एक आहोत असे मानतात. तेव्हा आदर्श रुपात एकात्मता साधली गेली असे म्हणता येईल.

## भारत व राष्ट्रीय एकात्मता

स्वातंत्र प्राप्तीनंतर राष्ट्रीय एकात्मतेचा विचार पंडित जवाहरलाल नेहरु यांनी भावनगर येथे झालेल्या अखिल भारतीय कॉंग्रेस अधिवेशनात मांडला व याच अधिवेशनात पं. नेहरु यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय एकात्मता परिषदेची स्थापना करण्यात आली. या परिषदेत सर्वच राजकीय पक्षांचे नेते, सर्व प्रांताचे मुख्यमंत्री, सर्व देशातील प्रमुख राजनीतीतज्ञ, शिक्षणशास्त्रज्ञ व समाजशास्त्रज्ञ यांना समासद म्हणून घेण्यात आले होते. तसेच सर्वच विश्वविद्यालयात इंग्रजी, हिंदी व इतर प्रादेशिक भाषांचा दर्जा व त्यांचा वापर याबाबत ही अभ्यास करण्याकरता डॉ. सुपर्णानंद यांच्या अध्यक्षतेखाली एक उपसमिती पण नेमण्यात आली होती.



क्षेत्रिय समस्या (Regionalism) वर विचार करण्याकरिता सामास्वामी अय्यर व सांप्रदायिक समस्यावर विचार करण्याकरता श्री. अशोक मेहता यांच्या अध्यक्षतेखाली उपसमित्या नियुक्त करण्यात आल्या. या समित्यांनी वर्तमान पत्राकरिता एक आचार संहिता तयार करण्याची सूचना केली. जेणेकरुन एकात्मता निर्मितीच्या कार्यात संदेश वाहणाऱ्या या प्रभावी साधनांचा योग्य वापर करुन घेता येईल.

## राष्ट्रीय एकात्मतेचे आधार

राष्ट्रीय एकात्मतेचे भावनात्मक एकात्मता (Emptional Intigration), सामाजिक एकात्मता (Social Intigration) व राष्ट्रीय एकात्मता (National Intigration) हे तीन आधार करणे आवश्यक आहे.

तसा विचार केल्यास सामाजिक एकात्मता व राष्ट्रीय एकात्मता या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. समाज एकसंघ झाला. समाज सदस्यात 'आम्हीपणाची भावना' (We feeling) निर्माण झाली. म्हणजेच पर्यायाने राष्ट्रीय एकात्मता साधली गेली. या सामाजिक व राष्ट्रीय एकात्मतेचा मूळ आधार भावनात्मक एकात्मता हाच आहे. भावनात्मक दृष्ट्या मला इतर भाषा बोलणारे इतर धर्मांचे किंवा इतर प्रदेशाचे लोक माझेच आहेत. माझ्याच राष्ट्राचे नागरिक आहेत असे वाटेल तेव्हाच सामाजिक किंवा राष्ट्रीय एकात्मता निर्माण होईल.

परंपरागत भारतीय संस्कृतीत अशी काही तत्वे किंवा श्रध्दास्थाने सापडू शकतात. ज्याच्या आधारावर भावनात्मक दृष्ट्या या समाजास एकत्र बांधता येईल. पर्यायाने सामाजिक व राष्ट्रीय एकात्मता साधता येईल.

## राष्ट्रीय एकात्मता निर्मितीच्या मार्गातील अडथळे

अगदी स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळापासून राज्यकर्त्यांनी व समाजसुधारकांनी या प्रश्नाचे महत्व ओळखून राष्ट्रीय एकात्मता निर्माण करण्याचे प्रयत्न केलेले दिसतात. पण अजूनही त्यांच्या प्रयत्नांना म्हणावे तितके यश प्राप्त झालेले नाही. व याचे महत्वाचे कारण म्हणजे सांप्रदायिकता, धर्मांधता, जातीवाद, भाषावाद व प्रादेशिकता यासारख्या बाबी या प्रयत्नांना खीळ घालीत आहेत.

## सांप्रदायिकता

भारतीय समाजात अनेक धर्मांचे व पंथाचे लोक सुरुवातीपासून आहेत. भारतातील खिश्चन, जैन व बौध्द समाज तसा भारतीय समाजाशी एकरुप झालेला दिसतो. पण मधून मधून अशाही काही घटना घडताना दिसतात की त्यामुळे हा समाज हिंदू समाजापासून दूर जात आहे काय ही शंका निर्माण होते. खिश्चनांनी दक्षिण भारतात पैशाचे आमीष दाखवून केलेले धर्मांतर, कोल्हापूरजवळ जैन व हिंदू समाजात बाहुबलीच्या मूर्ती स्थापनेबाबत झालेला वाद, मराठवाडा विद्यापीठ नामांतर इ. उदाहरणे राष्ट्रीय एकात्मतेला खिळ घालत आहेत.

## जातीयवाद

जातीयवाद किंवा आमच्या जातीसंबंधी पृथक्त्व यांचे आधारावर जाती भावना आजही अस्तीत्वात असून त्या राष्ट्रीय एकात्मतेस आव्हान देत आहे. काही राजकीय नेते आपले नेतृत्व टिकवून ठेवण्याच्या उद्देशाने देखील असे प्रश्न सतत खतपाणी घालून जिवंत ठेवत असतात. यामुळे भारत सदैव अंतर्गत कलहात गुरफटलेला दिसतो. सामान्य जनसाधरणाला जातीचा वृथा अभिमान देऊन त्यांच्या मनात जातीवादाचे विष पेरण्याचे काम काही राजकीय पक्ष व नेते करत असतात. तेव्हाच ते एकतेला खीळ घालत असतात हे आम्हाला केव्हा समजणार?

## राष्ट्रीय एकात्मता - काही उपाय -

राष्ट्रीय एकात्मता निर्माण करण्यासाठी वेगवेगळ्या विचारवंतांनी मौलिक सूचना केल्या. १९४८ मध्ये भाषा संबंधीत संसदीय समितीने राष्ट्रीय एकात्मते संबंधी पुढील उपाय सांगितले आहेत.

१. सर्व भारतीय भाषांची एक राष्ट्रीय अकादमी स्थापन करण्यात यावी. जी घटनेतील तरतुदीनुसार संसदीय व प्रादेशिक भाषांचा विकास करेल.

२. हिंदीला राष्ट्रभाषा म्हणून प्रशासन व शिक्षणात योग्य

[illegible]
[illegible] साधण्यात यावा.

१. [illegible] प्रादेशिक [illegible] हिंदीवरही [illegible]

[illegible]

१. सामुदायिक [illegible] निर्माण [illegible]

२. [illegible] हिंदू - मुसलमानांतील [illegible]

३. [illegible]

[illegible] राष्ट्रहितापुढे [illegible] धार्मिक, [illegible] जातीय हित [illegible] राष्ट्रहितासाठी [illegible] 'हम सब एक है' [illegible] बंधुत्वाची भावना [illegible] पाहिजे. [illegible] विकासशील [illegible] निर्माण [illegible] भावना प्रत्यक्षात उतरली पाहिजे.

□ □ □ □

## आई वडिलांना विसरु नका

दुसरे सारे काही विसरा
परंतु आई वडिलांना विसरु नका
त्यांचे उपकार अगणित आहेत
त्यांना विसरु नका....

त्यांनी असह्य वेदना सहन केल्या
तेव्हाच आपण पृथ्वी पाहू शकलो
त्या पूज्य जनांचे हृदय
तुम्ही दगड बनून ठेचू नका....

त्यांना विष पाजू नका
मुलांपासून सेवेची इच्छा धरतात
तर मुलांप्रमाणे सेवा करा
जसे कराल तसे भराल हे विसरु नका...

जी भिजलेल्या कपड्यावर झोपून
तुम्हास सुक्या कपड्यावर निजवले
तिच्या डोळ्यात अश्रू
येतील असे वागू नका....

ज्यांनी तुमच्या मार्गावर फुले पसरली
त्यांच्या मार्गातील काटे बनू नका
पैसे खर्चून सर्व काही मिळेल
पण आई वडील मिळणार नाहीत

त्यांच्या गरजा पूर्ण करण्यास विसरु नका
त्यांच्या पूज्य चरणांची आठवण ठेवा
त्यांना कधीही विसरु नका
हे तुम्ही सर्वांनी विसरु नका....

**कु.देडगे स्नेहलता विष्णू,**
**बी.ए.भाग-२**



## "बहुजनांचे कर्मवीर अण्णा"

[illegible]
बी.ए.भाग-२



"धन्य धन्य कर्मवीर
जगी झाला हा ही थोर
सेवेचा त्यागाचा मंत्र स्वीकारी
ज्ञानाच्या गंगेचा हा- ही पुजारी
सिंह गर्जना करी, सिंह गर्जना करी.
मानवतेच्या मुक्तिसाठी संघर्ष हा ही करी"

एक दिवस सोन्याचा उगवला १८८७ सालातील २२ सप्टेंबर या शुभदिनी गंगमातेने एका सुपुत्राला जन्म दिला. रयतेचा सुपुत्र भाऊराव पाटील यांचा जन्म कुंभोज या गावी झाला.

भाऊराव पायगोंडा पाटील यांना सामान्यतः कर्मवीर भाऊराव पाटील असे संबोधले जाते. कर्मवीर म्हणजे सतत कार्यरत असणारे व्यक्तिमत्व. भाऊरावांना ही पदवी कोणत्याही शासनाने दिली नाही. भारताचे राष्ट्रपिता गांधीजी जसे सगळीकडे 'महात्मा' म्हणून ओळखले जातात. टिळकांना जसे 'लोकमान्य' म्हटले जाते किंवा "चित्त [illegible] भाऊराव पाटील यांना [illegible] कर्मवीर ही पदवी प्रदान केली. [illegible] 'कर्मवीर' [illegible]

[illegible] कोल्हापूरला जैन [illegible] दाखल केले.

भाऊरावांना पुस्तकी अभ्यासाची कधी आवड त्यात व्यायामाची गोडी. नापासाची धास्ती नाही. मग काय शाळेत होईल तेवढाच अभ्यास. बाकी सारा वेळ खेळ ! खेळ!! इंग्रजी सारखे विषय काही खेळत खेळत करण्यासारखे नव्हते. भाऊरावांना इंग्रजी सहावीत जबरदस्त ठेच बसली. ते नापास झाले व नापास झाल्यामुळे त्यांनी शाळेला कायमचा रामराम ठोकला.

भाऊरावांनी शाळा सोडली. तेव्हा त्यांचे वय होते अठरा. म्हणजे त्या काळाच्या मानानं लग्नाचे वय. भाऊरावांचेही अठराव्या वर्षी लग्न झाले. मातुःश्रींनी कुंभोजच्या पाटलाची मुलगी आदाक्का सून म्हणून पसंत केली. लग्नापूर्वीच्या आदाक्का नंतर लक्ष्मीबाई झाल्या. शाळा सोडल्यानंतर पुढे काय करावे हा प्रश्न भाऊरावांच्या समोर उभा राहिला. नव्या जबाबदारीमुळे नोकरीची गरज त्यांना भासू लागली. नेमके काय करावे हे त्यांना सुचेनासे झाले. याच सुमारास कोल्हापूरला जैन समाजाचे अधिवेशन

भरले होते. तेथे त्यांनी उत्तम स्वयंसेवक म्हणून काम केले. त्यांचे हे काम पाहून शेठ माणिकचंद हिराचंद खुष झाले. हे शेठ म्हणजे हिऱ्या मोत्याचे मोठे व्यापारी. नंतर मुंबईला शेठजींनी भाऊरावांना आपल्या दुकानात विक्रेता म्हणून ठेवले. परंतू त्यामध्ये त्यांचे मन रमेना. शेवटी त्यांनी मुंबई सोडली व घर गाठले. त्यावेळी त्यांचे वडील कोरेगावला होते. गावी आल्यावर भाऊरावांनी नोकरीची शोधाशोध सुरू केली. त्यांना आपल्या वडिलांच्या [illegible]मध्ये क्लार्कची नोकरी मिळाली. पण कागद वर [illegible] करण्याचा, अंधाऱ्या खोलीत डांबून घेण्याचा त्यांना [illegible] आला व त्यांनी ही नोकरी सोडली.

काही प्रसंग तसे छोटे असतात पण तेच मनुष्याच्या आयुष्याला कलाटणी देतात. तो एक क्रांती क्षण असतो. भाऊरावांच्या आयुष्यात असाच प्रसंग घडला. नेहमीची जेवनाची वेळ होती. घरात पाहुणे आले होते. पाहुण्यांनी जेवायला बसल्यावर भाऊरावांच्या वडिलांना सहज विचारले, "आपला हा मुलगा भाऊ, सध्या काय करतो?" "काही करत नाही. दोन वेळेला जेवतो व भटकतो. पण सध्या तो एकटा नाही. त्याची बायकोही आहे." वडील तिरकस बोलले. याचवेळी भाऊरावांची पत्नी सर्वांना वाढत होती. त्यांना हे वाक्य फार झोंबले. त्यांचे डोळे आश्रूंनी भरले सर्वसागोर ते पुसताही येईनात. भाऊरावांना त्या वाढीत असताना त्यांचे आश्रू त्यांच्या ताटात पडले. अश्रू पाहून भाऊरावांना फार दुःख झाले. त्यांना घास गिळवेना. वडिलांनी आपल्या पत्नीच्या व पाहुण्यांच्या समोर आपली निर्भत्सना करायला नको होती. त्यांचा राग अनावर झाला. ते भरल्या ताटावरून उठले व आता या अपमानाला उत्तर दिले पाहिजे. आपण काही तरी केलेच पाहिजे असा निश्चय मनोमन पक्का केला व विचाराच्या तंद्रीतच साताराचा रस्ता धरला.

भाऊरावांनी सातारा गाठले, पण काय करायचे याचा निर्णय होईना. आता परत घरी जायचे नाहीं हा निर्णय पक्का होता. शेवटी गड्द अंधारातही त्यांना प्रकाचा किरण दिसला. जगण्याचा मार्ग दिसला. आपण शिकवण्या करायला काय हरकत आहे? पोटापुरती कमाई मिळेल त्यांचा विचार पक्का झाला. सहावी नापास असलेले भाऊराव "गुरूजी" झाले. इंग्रजी, गणित, संस्कृत या विषयाच्या शिकवण्या त्यांनी सुरु केल्या.

भाऊराव पाटील प्रथम शिक्षणाकडे वळले ते एक उदरनिर्वाहाचे साधन म्हणून व ते कार्य त्यांनी चोखपणे पार पाडले. या शिकवण्या करत असतानाच त्यांना शिक्षण हेच आपले अंगीकृत कार्य आहे याचा साक्षात्कार झाला. जे लोक आपल्याला पैसे देऊ शकत नाहीत अशांच्या मुलानांही शिक्षण मिळायला हवे. असे त्यांना तीव्रतेने वाटू लागले. ही उर्मी इतकी उत्कट होती की त्यामुळे त्यांनी १९०९ मध्ये दुधगाव येथे शिक्षण प्रसारक संस्था स्थापन केली. नेर्ले, काले, या खेडेगावातही त्यांनी वसतीगृहे काढली.

अण्णांच्या कार्याचा वटवृक्ष झपाट्याने वाढत चालला. म्हणजेच त्यांच्या संस्थेचा म्हणजे रयत शिक्षण संस्थेचा व्याप खूप वाढत गेला. वसतिगृहे, प्रा. शाळा, मा. शाळा इ. सुरु करून यशस्वी करून दाखविल्या. शिक्षण हे गरीबांच्या झोपडीपर्यंत नेले.

दलित वर्गाकडे अत्यंत सहानुभूतीने पाहणारे व त्यांना शिक्षण देण्याचे पवित्र काम सुरु करून समाजात प्रतिष्ठा मिळवून देण्याचा मार्ग दाखविणारे भाऊराव पाटील. हे महाराष्ट्रात तळमळीने कार्य करणारे अवतरले. म्हणूनच आजच्या समाजाची खरी सुधारणा दिसत आहे.

भाऊरावांनी सुरू केलेली रयत शिक्षण संस्था ही एक ज्ञानगंगा होय. या संस्थेचे मुख्य सूत्र Earn and Learn - 'कमवा व शिका' हे आहे. भाऊरावांच्या कार्याचा गौरव करताना म. गांधीजींनी असे उद्गार काढले होते की- "अनेक शतकात जे इतरांना करता आले नाही ते महत्वाचे कार्य भाऊरासांनी आपल्या हिमतीवर करून दाखविले!"

भाऊरावांची सारी हयात अज्ञानांना ज्ञान देण्यात, संस्कृतीची शिकवण देण्यात, आजवर अंधारात राहिलेल्या मुलांवर ज्ञानाचे पैलू पाडून त्यातून अनेक तेजस्वी हिरे समाजापुढे चमकत ठेवण्याची अपूर्व कामगिरी करण्यात खर्ची पाडली.

अण्णांनी दलितोद्धार, अस्पृश्यता निवारण, सार्वत्रिक



शिक्षण, समाज जागृती अशी कामे केली. त्यासाठी ते आपला देह चंदनासारखे झिजवीत होते. त्या झिजणाऱ्या देहाचा सुगंध खेडोपाडी दरवळत होता. व त्या सुगंधाचा शोध घेत हजारो मुले भाऊरावांच्या आश्रयाला येत होती. त्यांच्या आश्रमात राहून ज्ञानदीपाच्या प्रकाशात सुखी जीवन जगत होती.

भारत सरकारने भाऊरावांच्या उचतर कार्याचा गौरव करण्याच्या दृष्टीने त्यांना सन १९५९ साली २६ जानेवारीला पद्मभूषण ही पदवी देऊन सन्मान केला. मुंबई सरकारने त्यांना अस्पृश्यता निवारण कार्याबद्दल प्रशंसाविले. पुणे विद्यापीठाने त्यांना डी. लीट ही पदवी देऊन भूषविले. या सर्व घटना त्यांच्या कार्यपूर्तीची साक्ष देत आहेत.

मनुष्य किती जगला यापेक्षा तो कसा जगला याला खरं महत्व! 'मरावे परी कीर्ती रुपे उरावे' या कसोटीला जो टिकला त्याची जीवन यात्रा सफल झाली. लोक त्याला कधीच विसरू शकत नाहीत. भाऊरावांच्या बाबतीत तसेच म्हणता येईल.

"ज्ञान गंगा लाजविते साऱ्या जगाला.
आशीर्वाद आहे त्यांचा साऱ्या रयतेला
देह झिजवला, आनंद झाला अजिंक्यताऱ्याला,
विसरू नका तुम्ही आमच्या कर्मवीरांना."

दिनांक ९ मे १९५९ हा भाऊरासांच्या जीवनातील अखेरचा दिवस! थकला जाणारा हा जीव या दिवशी सर्व जगाचा अखेरचा निरोप घेऊन चिरशांती घेण्यासाठी कायमचा दूर गेला. रयत शिक्षण संस्थेचे जनक जगावेगळे झाले. एका ज्ञान सूर्याचा अस्त झाला. भाऊरावांची जीवनयात्रा सफल झाली.

❑ ❑ ❑ ❑

## गुलाबपक्षी

अंगणात माझीया उमलते गुलाब पुष्प
सौंदर्य त्याचे वर्णावयाला अपुरे की शब्द
येते ज्याने मला दिव्यत्वाची प्रचिती
हात न लावीन की न भंगो पवित्रता त्याची
की असते त्याचे अस्तित्व मजसाठी वेगळे
नच आठवतील मजला मादक डोळे अन केस कुरळे
न ओठ, न गाल, रंग न त्याचा रुहिरासम लाल
मी न ते तोडीन की केसात माळीन
सुंदरतेला त्याच्या दुरुनच नमस्कारीन
दिधले त्याने दृष्टीसुख तेवढेच मला-पुरे
गंधही ज्याचा आसमंतात दरवळून उरे
परि क्रोधीत गुंगीत झाली मनी माझी
वृत्ती पाहून विघ्नसंतोषी लोकांची
की जे नच वंदतील दुरुनच सुंदरतेला
कुस्करुन तिला शमवितील क्षणिक इच्छेला
जळो त्यांची पूजकता ती सौंदर्याची
ही तर वृत्ती की हो खाटीकांची

कु. आसावरी गुजर, बी.ए.भाग-३

## भावना

प्रतिबिंबाच्या अप्रतिम किरणांनी
भावनेच्या विचारात दडलेल्या
असंख्य कल्पनेच्या रेषमी
जाळ्यात अडकलेल्या मनाचा
गुंता कोण सोडविल का?

अंतरंगी मनाच्या सागरात
सप्तरंगी कल्पनेच्या किरणांत
भावनेच्या मेघरूपी दाट छायेतील
अश्रूंच्या वर्षावात थेंबाची
वलये कोन मोजील का?

वलयांच्या अनोख्या स्पंदनात
आयुष्याच्या सुंदर स्वप्नात
मनाच्या अस्पष्ट आरशात
अंतःकरणाच्या सुगंधी गाभाऱ्याच
दर्शन मला कोण देईल का?
भक्ताच्या अनोळख्या हृदयात
अनमोल करूनेच्या भरात
अनोळख्या मनाच्या छायेतील
विचारांच्या सापळ्यात अडकलेल्या
भावनेची कदर कोण करील का?

कुंभार सुवर्णा शंकरराव, बी.ए.भाग-३

# वृत्तपत्रे लोकशाहीचे प्रभावी साधन

कु. बेबीताई माने
बी.ए.भाग-१



"अहो चहा घ्यायला येताय ना ?
किती शाळेत जायची वेळ झालीय!"
"बापरे! किती वेळ झालाय, ऑफिसला जायला!"

अशा प्रकारचे अनेक संवाद आपणाला घरोघरी ऐकायला मिळतात. कशामुळे माहिती आहे? अहो! वर्तमानपत्रामुळे! कारण काही वाचक वर्तमानपत्र वाचण्यात इतके दंग झालेले असतात की त्यांना वेळेचे भानच रहात नाही. ते वर्तमानपत्र वाचत असताना आपले तन, मन, धन विसरतात. त्यामुळे त्यांची इतकी धांदल उडते की बोलता सोयच नाही.

वर्तमानपत्राचा इतिहास माहित्य आहे का तुम्हाला? अहो! पहिले वर्तमानपत्र हे "गोविंद कुंटे" यांनी १८४९ साली सुरू केले. त्याचे नाव 'प्रभाकर' समाजाच्या आर्थिक, सामाजिक गरजा लक्षात घेऊन देशाचा आर्थिक विकास कसा होईल हे जाणून त्यांनी आपले वर्तमानपत्र सुरू केले वर्तमानपत्राशिवाय देश, समाज, व्यक्ती सुधारणार नाही हे गोविंद कुंटे यांनी जाणले होते

आजच्या वर्तमानयुगात वर्तमानपत्र हे मानवाच्या आवश्यक गरजेपैकी एक आहे. सकाळी वर्तमान जर वाचायला मिळाले नाही, तर सकाळचा चहा काय पण नाष्ट्यालासुध्दा चव लागत नाही. वर्तमानपत्राचा संबंध हा अनेक वेगवेगळ्या प्रकारच्या वर्तमानपत्राच्या रूपातून जगापुढे येतो.

वर्तमानपत्रामुळे माणूस सुसंस्कृत बनतो. वर्तमानपत्राचे अनेक उपयोग आहेत. वर्तमानपत्रामुळे आपल्याला घरबसल्या जगातील घडामोडी, त्यांची कारणे, त्याचे परिणाम समजतात. विज्ञानाचे आविष्कार, भयंकर अपघात, राष्ट्राचे अनेक राष्ट्रांशी असलेले संबंध, त्यांची मांडणे, उपोषणे, याबाबी आपल्याला वर्तमानपत्रामुळे समजतात. वर्तमानपत्रामुळे आपल्याला सर्व जगातील हालचालींचे ज्ञान होते. राजकारणातील घटनांना वर्तमानपत्रात विशेष स्थान असते. याशिवाय बाजारातील दुर्मिळ वस्तुंच्या किमती समजतात. उदा. सोने, चांदी इ. वर्तमानपत्र क्रिकेट, कबड्डी, खो-खो इ. खेळांची माहिती देऊन मनोरंजन करते. म्हणजे वर्तमानपत्राबाबत असे म्हणता येईल की -

जो करील मनोरंजन जनतेचे ।
जडेल नाते प्रभूशी तयाचे ॥

पोलिस टाईम्स, पोलिसवाणी, ऐक्य, केसरी, पुढारी, लोकवाणी, लोकसत्ता, सकाळ, त्याचप्रमाणे रविवारचे अंक सर्वांनाच प्रिय असतात. त्यात विनोद, चुटके, म्हणी, अभिनेत्यांचे विचार, क्रांतीकारकांचे विचार, असे कितीतरी असते. यामागे एकच हेतू असतो आणि तो म्हणजे देश सुधारावा. याशिवाय वर्तमानपत्रात नाटक, निबंध, कविता इ. असतात. त्यामुळे वर्तमानपत्र लोकांना



विचार करायला लावते. वर्तमानपत्रामुळे ज्ञानात वाढ होते. मनोरंजनही होते. वर्तमानपत्र हे एखाद्या समाजसुधारकांची भूमिका बजावते. ते नवजागरणाचे संदेशवाहक आहे. वर्तमानपत्रात व्यंगशब्दही असतात उदा. - कलियुगी उध्दार हरीनाम - हर्षद मेहता, याबरोबरच प्रभावी प्रकरणे, त्याची कारणे, त्यांचे जगावर होत असलेले परिणाम वर्तमानामुळे आपल्याला समजतात. उदा. बोफोर्स प्रकरण, हर्षद मेहता बँक प्रकरण इ. लोकसंख्या कमी होण्यासाठी वर्तमानपत्रात अनेक मनाला गुंतवून टाकणारी वाक्ये असतात.

"हम दो हमारे दो"
"'दोनच पोरं, सुखाचं वार घरात सारं" अशाप्रकारची वाक्ये असल्याने वाचकांच्या मनावर चटकन परिणाम होतो व तो चांगले वर्तन करतो.

वर्तमानपत्रांना संकटात खूप महत्व दिले जाते. पूर, दुष्काळ, भूकंप इत्यादी समस्यात सापडलेल्या लोकांना वर काढण्याच्या बाबतीत वर्तमानपत्र मदतीचा हात पुढे करते. नवन नवीन चांगले विचार वर्तमानपत्र सामान्य जनतेपर्यंत पोहचविते. वर्तमानपत्र हे युध्दाचे व निवडणूकीचे दुधारी शस्त्र आहे.वर्तमानपत्र म्हणजे एक प्रकारचा ग्रंथ आहे. एक प्रकारचे वाङ्मय आहे. म्हणूनच म्हणतात की--

The Literature is what it is and what ought to be.The literature is to teach, to delight and to give a knowledge. वर्तमानपत्र जगात शांतता रहावी म्हणून सतत प्रयत्न करते. सरकार आणि नागरिकांच्या हक्कांचे रक्षण करीत असते. नि:पक्षपाती वर्तमानपत्रे जनतेचे महान सेवक आहेत. वर्तमानपत्र म्हणजे समाजमनाचा आरसा होय.

दुर्दैवाने कधी कधी काही वर्तमानपत्रे धर्म, संप्रदाय व जाती यांच्यात फूट पाडून समाजातील शांतता भंग करतात. काही वर्तमानपत्रे तर अशी असतात की वाईट घटना, खोटे शोध, चटनी मीठ लावलेल्या घटना इत्यादींव्दारे जनतेला धाब्यावर सोडतात. अशा प्रकारची कृत्ये करून वर्तमानपत्र स्वतःस्वातंत्र्याला जाऊन आपल्या देशाची अधोगती करतात.

परंतु या वर्तमान युगात वर्तमानपत्रांना खूप महत्व आहे. या जगातील महान शक्तीत त्याचे नाव घेतले जाते. कुणीतरी म्हटले आहे की -

खींचो न कमानों न तलवार निकालो।
जबतोप हो मुकाबिल तो अखबार निकालो॥

पण वर्तमानपत्राचा उपयोग व्यक्ती, समाज, देश, यांच्या कल्याणासाठी, विकासासाठी केला पाहिजे अधोगतीसाठी नव्हे !

❑ ❑ ❑ ❑

## बांगड्या

जीवनभर बांगड्याची साथ
जन्मापासून मृत्यूपर्यंत बांगड्याचे हात
कधी सुख देवून जातात
तर कधी दुःख पदरात घालतात
लग्नात जीवनाचा साथीदार देतात
चुडा होवून जीवन रंगून जातात
हिरव्या बांगड्या म्हणजे सौभाग्याचं लेणं
हे समजतात स्त्रिया देवाच देणं
बांगड्या म्हणजे असते जीवनाच बंधन
तिला वाटत असतं जीवनात मिळालेलं अंदन
आपल्या आवाजानं मुग्ध पाडतात
हव असणार सुख देऊन जातात
पण शेवटी मात्र काहींच्या नशिबी
देवून जातात वैधव्याच दान
हिरावून नेतात सौभाग्याचं लेणं

कु. मदने एम. यु.
बी.ए.भाग-२

# स्त्री मुक्ती - काळाची गरज

कु. योगिता केशव भस्मे
बी.ए.भाग-३



'स्त्री' आजची संस्कृती मानली जाते. स्त्री म्हटलं की असहाय्य, दुर्बल किंवा जिला स्वतःचं रक्षण करता येणार नाही. प्रत्येक साध्या गोष्टींसाठी सुध्दा जिला पुरुषांवर अवलंबून रहावं लागेल, अशी गरीब मिश्री, हे झालं फार पूर्वीचं.

कारण स्त्री की जी एक माणूस आहे. तिला स्वतःच्या खास भावना आहेत, मग मानसिक असोत वा शारीरिक. तिला स्वतःचे निर्णय घेता येतात. तिला बोलताही येत नि स्वतःचे रक्षणही करता येतं. किंबहुना ती आता हे सगळं करायला शिकलीय, असं होईल फार तरं.

पूर्वीइतकी बांधिलकी, विचारातला अडाणीपणा अगर मागासलेपणा इतकासा नाही. तिच्या कर्तृत्वाला विचारांना नवीन क्षितीजं लाभताहेत. तिच्या प्रामाणिकपणावर कर्तृत्वावर कुणीतरी सार्थ विश्वास दाखवतयं, आणि त्या उमेदीमुळं ती उठतेय, नि पुढे सरसावतीय अ... आजचं चित्र आहे. विविध क्षेत्रात तिने आपले निर्विवाद नेतृत्वही सिद्ध करुन दाखवलंय.

आज जरी स्त्री शिकली तरी तिला स्त्रीच्या वेळी रस्त्यावरुन प्रवास करताना सोबतही हवीच असते कारण तिला आपण असुरक्षित आहोत असं वाटतं जरी स्त्री विचारानं वागण्यात, बोलण्यात पुढारली तरी तिला तिच्याबरोबर शिकलेल्या, वावरलेल्या समवयस्कांची शाश्वती वाटत नाही.

स्त्री वकील होऊ दे, अगर डॉक्टर, इंजिनिअर तिला लग्न हे करावचं लागतं. आईवडील दोघही समान शिकलेले, विचारांनी सारखेच असले तरी मुलांच्या नावात तिच्या नावाचा लवलेशही नसतो. खरंतर मुलांच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडण घडणीत वडिलांपेक्षा आईचाच जास्त वाटा असतो.

लहानपणापासून आईवडीलांच्या, नातेवाईकांच्या नजरेखाली, तरुणपणी नवऱ्याच्या वर्चस्वाखाली, तर म्हातारपणी असहाय्यतेशिवाय जवळ काहीच नसतं, तेव्हा डोळ्यात न मावनारी 'पोरांनी सांभाळावी' अशी करुणा, घेऊनच तिला जगावं लागतं.

आज पुढारलेल्या गोष्टींचे, विचारांचे, अंध अनुकरण करणारे, आपण सारेजण 'ॲटॉप हिल सारख्या ठिकाणी घडलेल्या एका कोवळ्या मुलीच्या बलात्काराची बातमी ऐकून फक्त 'हाय! उद्गार काढून कातडी बचाव धोरण स्वीकारतो.

"अबला जीवन हाय तेरी यही कहानी
आँचल में है दुध और आँखों में पानी।"

'हे मैथिलीशरण गुप्तांचं, म्हणनं केवळ हुंडाबळी ठरलेल्या स्त्रियांनाच लागू पडतं, असं नव्हे, तर इतर बऱ्याच स्त्रियांनाही लागू होतं. त्याना अबला रराखण्यात



पुरुषांबरोबर स्त्रियांचाही वाटा तितकाच आहे हे ही सत्य आहे.

"यत्र नार्यस्तु पुजन्ते रमन्ते तत्र देवता ।"

म्हणताना स्त्रिया वंदनीय, पूजनीय वाटतात. मात्र वागताना तिला सहन करावी लागते अवहेलना. आज तरी स्त्री स्वतंत्र झाली असे म्हटलं, किंवा लिहलं गेलं तरी, तिला नोकरीच्या ठिकाणी केवळ ती 'स्त्री' म्हणून त्यापदासाठी नाकारलं जातं. किंबहुना तिला नोकरीवर घेतलं तरी तिला मिळणारी वागणूक निश्चितच समाधानकारक असेल असं नाही. अर्थात आता स्वैराचारही जास्त झाल्याचे जाणवते.

पूर्वी तिला 'रांधा वाढा नि उष्टं काढा' ह्या बरोबरच तिला उपभोगाचे साधन मानले जायचे. आजही थोड्याफार फरकाने कदाचित पुढारलेल्या बुरख्यातून तिला ही लादलेली भूमिका अजूनही सांभाळावी लागते.

कुठलीही क्रांती व्हायला थोडा वेळ हा लागतोच तसेच काहीसं स्त्रीमुक्तीवादाच्या बाबतीत झालं, जखडून ठेवलेल्या एखाद्या श्वापदाचे साखळदंड पूर्णपणे काढून टाकून त्याला रिकाम्या जागेत श्वास घ्यायला पाठवावे तसचं स्त्रीमुक्तीवादाचं झालं आणि क्रांती होते म्हटजे शेवटी होतं तरी काय? ठराविक टप्प्या टप्प्यानं एखाद्या विचाराचा विकास होतो म्हणजे क्रांती घडते.

प्रथमतः नुसतीच जाहिरातबाजी केल्यासारखं भासतं. मूळ आशय बाजूला राहून मग तिथं निरर्थक कोळीष्टकं जमा होतात. ती झटकणारा कोणी वाली भेटला की मग पुढे वाटचाल. आधी नुसतेचं स्त्रीला जखडून ठेवले गेले आहे. तिला मुक्त केलेचं पाहिजे. अशी विधाने केली गेली. तेव्हा हा विचार पुढे आलाच नाही. की ह्या पुरुष प्रधान संस्कृतीतून आपल्या समानता वादाकडे मुळी लगेच जाताचं येणार नाही. त्यासाठी जी स्वाभाविक मानसिकता लागेल ती यायला हवी. त्यासाठी वातावरणाची निर्मिती करता आली पाहिजे आणि महत्त्वाचा मुद्दा म्हणजे जखडून ठेवलेल्या श्वापदाला तरी एकदम मोकळ्या हवेचा झोत मानवेल काय? आपण जरी स्त्री पूर्णपणे स्वतंत्र करु शकलो तरी तिला ते तितक्याच ताकदीनं पेलता किंवा सहन करता येईल काय?

स्त्रियांनी आपली नैसर्गिक जबाबदारी झटकून पुरुषांसारखं वागावं, असे मुळीच नाही. त्यांच्या सूक्ष्मदर्शीचा, बुध्दीचा, संशोधन नि खिलाडूवृत्तीचा, अनोखा संगम राष्ट्रविकासाच्या कार्यात भर टाकील.

महात्मा फुलेंच्या मताप्रमाणे 'एक शिकलेली स्त्री पूर्ण कुटुंब शिक्षीत करते' हे वचन जेंव्हा प्रत्यक्षात येईल तेव्हा प्रौढसाक्षरते सारख्या कार्यक्रमांची आवश्यकता रहाणार नाही.

स्त्री जरी कोमल असली तरी ती कमजोर नाही. ती शूर आहे, हे तिनं सिद्ध करुन दाखवले आहे. आज जगात, देशात अनेक स्त्रिया आहेत की, त्यांनी प्रत्येक क्षेत्रात आपले नेतृत्व सिद्ध केले आहे इंदिरा गांधी, मागरिट थॅचर, मादाम क्युरी, झाशीची राणी, सरोजिनी नायडू, मदर तेरेसा, स्मिता पाटील, लता मंगेशकर अशा महान स्त्रियांनी राष्ट्राच्या जडण घडणीत खूप मोलाचे कार्य केलेलं आहे.

प्रत्येक माणसाच्या विचारांची बैठक प्रगल्भतेबरोबरच सखोल असायला हवी. तरच स्त्री असहाय्य, दुर्बल, राहणार नाही. घरकाम बालसंगोपन करुन ती इतर क्षेत्रात आपले स्थान कायम करेल. तसे पहायला गेले तर ती मुक्त होईल की अधिक गुंतली जाईल हे सांगता येणार नाही.

आपल्याला नुसतीच मुक्त स्त्री नको आहे. उनाड, गावभवानी किंवा शेळपट शेळी किंवा गरीब गाय होऊन राहण्यापेक्षा स्त्रीने 'माणूस' म्हणून रहायला, अस्तीत्वात यायला हवं. इथं मुक्त स्त्री म्हणजे शील आणि शालिनतेच्या कुंपणात वावरणारी स्त्री अभिप्रेत आहे. तेव्हा तिला खरा सुवर्णमध्य साधता येईल. तरच खऱ्या अर्थानं स्त्री "माणूस" होईल.

❑ ❑ ❑ ❑

## महागाईचा राक्षस करतो आयुष्याची उजाड राने

कु. ललीता म. उबाळे
बी.ए.भाग-१

सद्दाम्मेतेलशास्त्र हातात घेतल आणि माझ्या सारख्या कॉमन मॅनच पार कंबरडच मोडलं....

हृदयात भूक पोटात घालू द्या थैमान, कुरतडू द्या आतडी करू द्या रक्ताचं पान.


खरोखर एवढी सहनशिलता आजच्या माणसात आहे? सकाळी ७.३० ची लोकल पकडायची. ८ ते ५ काम करायचं आणि ५.१५ ची गाडी पकडून दमून, भागून घरी यायचं आणि पुन्हा म्हणायचं 'कुरतडू द्या आतडी करू द्या रक्ताच पान' मग याला उपाय? भ्रष्टाचार! मिळेल त्या पगारात भागत नसेल तर खा पैसे! भौतिक सुखांना लालचावलेल्या आजकालच्या लोकांनी या महागाईला खत पाणीच घातलंय! भौतिक सुखांचा दिवा खनिज तेलावर जळतो! ही अधुनिक म्हण म्हणावी लागेल....

भ्रष्टाचारानं थैमान घातलंय... अर्थ महागलाय... अनर्थ मात्र उदंड झाला..... दोन तोट्यांनी भरणाऱ्या आणि एका तोटीनं रिकाम्या होणाऱ्या हौदासारखं झालंय जीवन.... भ्रष्टाचार हा शिष्टाचार होऊ पहातोय....

विश्वास महागलाय पण त्याच बरोबर ममताही महागली आहे. महाग आहे असा जर आपण महागाईचा विग्रह केला तर तुमच्या हे लक्षात येईल की ही स्थिती किती करूणाजनक आहे. स्वत:च्या पोटच्या मुलाला पाळणा घरात ठेवून आई अर्थार्जनासाठी भटकते आहे... आणि म्हणूनचं म्हणावसं वाटतं

दारीद्रयाची लेवून वसते
कशी पहावी सुंदर स्वप्ने
महागाईचा राक्षस करतो
आयुष्याची उजाड राने

❑ ❑ ❑ ❑



"कशास भाषा व्यर्थ बोलता"
एकविसाव्या शतकाची
एकविसावाही न दिसावा
व्यथा आमुच्या दशकाची!
व्यथा आमुच्या दशकाची!!"

ओळखलत मला? मी एक 'कॉमन मॅन'. पोतभर पैसा घेऊन जाऊन पिशवीभरच सामान विकत आणणारा! आ.के.लक्ष्मण यांच्या व्यंग चित्रातला एक'कॉमन मॅन'....

माझी आजी मला गोष्ट सांगायची.दिडकीच तेल आणलं.... त्यात गाव जेवून गेलं...ऊरलेल तेल बुधलीत भरलं.... बुधली सांडली.... त्या पाटात उंट वाहून गेला. आता अतिशयोक्तीची गोष्ट सोडली तरी पूर्वीच्या काळी सुबत्ता होती, हे मात्र निश्चितच. एक काळ असा होता, जेव्हा भारतात सोन्याचा धूर निघत होता..... सोन्याच्या वासाने आले तुर्की आणि फिरंगी..... त्यांच्या लुटीनं आली जागतिक महामंदी..... परकीय गेले..... स्वकीय आले..... महागाईचे आलेख मात्र उंचावत राहिले.... उंचावतच....!



॥ स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रिद ॥
पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील

रयत शिक्षण संस्थेचे
महिला महाविद्यालय, उंब्रज

# ❑ त्रिवेणी ❑

## हिंदी विभाग

*"वो आदमी नहीं है मुकम्मल बयान है
माथे पे उसके चोट का गहरा निशान है।
सामान कुछ नहीं है फटेहाल है मगर
झोले में उसके पास कोई संविधान है।
देखे हैं हमने दौर कई अब खबर नहीं
पाँव तले जमीन है या आसमान है।
वो आदमी मिला था मुझे उसकी बात से
ऐसा लगा कि वो भी बहुत बेजुबान है।"*

— स्वर्गीय दुष्यंतकुमार

विभागीय संपादक :- प्रा. मारूफ मुजावर

# अंतरंग

## लेख


| | | |
|---|---|---|
| १. नारी और नौकरी | - | कु.संगीता घोरपडे/२७ |
| २. क्या स्वर्गसुख चाहीए। | - | कु.अंजना गदिया/२९ |
| ३. भारतीय उद्योग के शिल्पकार : जे.आर.डी.टाटा | - | कु.गीतगंगा शेवाळे/३१ |
| ४. सभ्यता आदमी है तो संस्कृति मानव | - | कु.विद्या सावंत/३३ |


## कविताएँ


| | | |
|---|---|---|
| १. यही है जिंदगी | - | कु.सीमा चव्हाण/३४ |
| २. मन का मधुवन | - | कु.विद्या सावंत/३४ |
| ३. हमें लक्ष्य पर बढना है | - | कु.मीना काटे/३५ |
| ४. माँ | - | कु.बेबीताई माने/३५ |
| ५. सबला नारी | - | कु.माया कुलकर्णी/३५ |
| ६. ये जीवन | - | कु.वल्लरी शिंदे/३६ |
| ७. सपनोंपर अधिकार | - | कु.संध्या पाटणे/३६ |
| ८. स्मारक | - | कु.संध्या भोराले/३६ |
| ९. क्या करते है हम | - | कु.उज्ज्वला पाखले/३६ |


❑❑❑❑

# नारी और नोकरी


कु. संगीता घोरपडे
बी.ए.भाग-३




जीवनरुपी रथ के दो चक्र हैं - नर और नारी। जबतक दोनों चक्र अपने अपने स्थान पर स्थित रहते हैं, रथ की गति बढती रहती है। दोनों का सामंजस्य आवश्यक है। जिस प्रकार रथ के एक चक्र से रथ की गती नहीं बढती वैसी ही बात जीवन या घरबार की होती है। पति एवं पत्नी, इन दोनों से संसार को पूर्णता प्राप्त होती है।

भारतीय संस्कृति में स्त्रियों को बहुत ही आदरणीय माना है। यहाँ कोई भी धार्मिक कार्य पत्नी के बिना पूरा नहीं होता। सती मदालसा की तरह अपने पुत्र तथा पुत्रियों को उत्तम उपदेश देकर मुक्ति का अधिकारी बनाती थी। स्त्री को पुरुष की अर्धांगिनी माना जाता है। प्राचीन काल में नारी को समाज में स्थान था। तत्पश्चात घर का प्रधान पुरुष माना गया। वह स्त्रियों को अंकित करता गया। फलतः वह सिर्फ एक भोगवस्तु मानी गयी। नारी को घर- चारदिवारी में कैद करके, उसकी स्वतंत्रता का अपहरण किया गया।

मनु के अनुसार - 'न स्त्री स्वातंत्र्यम् अर्हति' उक्ति नारी पर लाद दी गयी। उसे केवल कोमल मानकर, कमजोरी उसके मत्थेपर थोप दी गयी। मानवी सभ्यता के कुछ ऐसे दौर आये जिसमें नारी शिक्षा से वंचित करा दी गयी।

किंतु परिवर्तन मानव जीवन का अंश होने के कारण नारी की स्थिति में शिक्षा के कारण बदलाव आने लगा। बदलते युग के साथ भारतीय स्त्रीयों की उन्नती होने लगी। उसके कई कारण है। परिणामतः नारी अपने अधिकारों के प्रति सजग होने लगी। उसने पुरुष के समान अधिकार प्राप्त किए। वह पुरुष के कंधे से कंधा मिलाकर काम करने लगी। किंतु आज भी दकियानुसी लोग नारी के पैर में रोडा अटकाने की कोशिश करते है। फिर भी वह इन रुकावटों का सामना करते हुए अपने पैरों पर खडा होने का प्रयत्न कर रही है।

नारी और नौकरी के प्रश्न का एक पहलु यह भी उभरता है कि आज की नारी उन्मुक्त होती जा रही है। सचाई तो यह है कि नौकरपेशा नारी की अपनी जीवनदृष्टि होती है। आज भी अनेक स्त्रियाँ पति का अत्याचार सहन कर लेती है क्यों-कि वह अपने पैरों पर खडी नहीं है। जो नारी नौकरपेशा है, वह कुछ हदतक अन्याय सह सकती है। पर उसकी भी एक सीमा है।

आज के इस प्रगतिशील या संघर्ष प्रधान युग में ऐसी परिस्थितीयाँ बन गई है कि नारी को नौकरी से अलग रखना नामुमकिन है। इस बढते हुए महंगाई के दिनों में भी नारी को नौकरी करना अत्यावश्यक हो गया है। आज नारी को पुरुषों के समान अधिकार

प्राप्त है। उसे पैतृक संपत्ति में भी अधिकार प्राप्त है। आज का नारी समाज जागृत हो गया है। वह पुरुषों के समान उँचे-उँचे ओहदों पर कार्यरत है। आज की नारी डॉक्टर, अभियंता, अध्यापिका तथा अनेक शासकिय कार्यालयों में अपना स्थान बना चुकी है।

लेकिन आज के आधुनिकतावादी युग में भी कुछ लोगों को नारी के नौकरी करने पर एतराज है। उनकी दकियानुसी जबान कहती है कि नारी के नौकरी करने से हमारी संस्कृति मिट्टी में मिल जाएगी। दुसरी बात जब घर में पत्नी नौकरी करती है तो वह पत्नी पति का अन्याय सह नहीं सकती। इसी कारण कुछ पतियों को पत्नी का नौकरी करना कतई पसंद नही है।

यह बात तो स्पष्ट है कि नारी नौकरी करती तो जरूर है, पर उसका ध्यान अपने घर की ओर अवश्य रहता है। वह उस चिड़िया की तरह अपने घोंसले से बाहर रहती है, पर संध्या के समय अपने बच्चों के वात्सल्य के खिंचाव से नीड़ की ओर चली आती है। नारी के नौकरी करते समय कुछ कर्तव्य उसके बनते हैं। उनमें घर की देखभाल, परिवार की मर्यादा, नैतिक मूल्यों की वृध्दि तथा शालिनता आदि बातें समाविष्ट हो जाती है। जिसे पूरा करने में तत्पर रहती है।

आज नारी को पुरूष से हीन या दुर्बल समझना हमारी संकुचितता का चिन्ह मात्र है। उसमें भी उतना ही उत्साह, धैर्य, बल, बुध्दि तथा साहस है जितना पुरुष में है। इसका प्रमाण वे नारियाँ हैं, जो नौकरी करके पति का हाथ बटा रही हैं एवं घर की व्यवस्था स्थिर रखने में सहयोग प्रदान कर रही हैं। वह सही मायने में आज संसाररुपी रथ का दूसरा पहिया बन गयी है। इससे भी आगेचलकर कहा जाए तो, आज नारी सभी विभिन्न क्षेत्रों में पुरूष से भी अधिक सक्षम है।

❑ ❑ ❑ ❑

## 'ये भी सुनो!'

- जीवन फूल है तो प्रेम उसकी सुगंध।
- खुद को संभाल लेने में ही वीरता है।
- जिंदगी एक खिलौना है, मान लिया तो अपना है।
- इन्सान की पहचान उसके विचारों से होती है, धन से नहीं।
- पुरुष को प्रदान किया हुआ तोहफा नारी है।

सं - कु. अपर्णा गणपुले
बी.ए.भाग-३

❑ ❑ ❑ ❑



# क्या स्वर्गसुख चाहिए!

कु. अंजना गदिया
बी.ए.भाग-३



शीर्षक पढकर चौंक गये! बात स्वर्गसुख की है। पर मैं परलोक के स्वर्ग सुख की नहीं, इस लोक के स्वर्गीय सुख की बात कर रही हूँ। आज इस युगमें घर गृहस्थी चलानेवाले अपने कर्तव्य से भटक चुके हैं। जिसमें नारी समाज तो सबसे ज्यादा है। उनकी दृष्टिमें परिवर्तन नहीं आया। आज जिधर देखो सभी एक दूसरे की टीका टिप्पणी करते हुए दिखाई देते हैं। सास बहुकी, बहु सासकी आलोचना करती रहती हैं। फिर भी दिनभर उन्हें एक दूसरे का सामना करना ही पडता है। फिर परस्पर लड़ने झगडने से क्या फायदा? सास बहु को ताना देती है,-'तुझे रसोई बनानी नहीं आती, सब्जी में नमक ज्यादा है, तेल का इस्तेमाल ज्यादा है, बाप के घर से कुछ सीख कर नहीं अयी!' मेरी बेटी को देख लो,-'सब काम कैसे सलीके से करती है, भोजन में, सिलाई-कढाई में, सब कामों में दो कदम आगे ही है।'

नणंद भी ताने कसती है। वह यह नहीं सोचती की पीहर तो भैय्या-मामी का है। माता-पिता से स्नेह मत रखो। पर माता-पिता से जितना प्रेम है, उतना मामीसे भी किया तो क्या प्रेम-जल घट जाएगा? कुंआरी अवस्था में मामी से अच्छा बरताव किया हो, मामी का मन जीता हो तो बादमें मामी अपने पीहर पहुँचने पर खुश होगी। नणंद को यह भी सोचना चाहिए कि मैं जितना रौब यहाँ झाड़ती हूँ, उतना ससुराल पहुँचने पर मेरी नणंदे रौब झाडेगी तो क्या होगा?

मामी को भी सोचना चाहिए कि मेरी नणंद मुझसे हिल-मिलकर रहती है तो मुझे भी उसमें शामील होना चाहिए। जब दोनों की दृष्टि बदल जाती है, तब एक-दुसरे के प्रति स्नेह का मेघ बरसता है, जिस कारण घर स्वर्ग बनने में देर नहीं लगेली।

यह बात नंणद-भाभी की हुई। अब सास-बहु की बात छेडती हूँ। जिन दो व्यक्तियों पर घर गृहस्थी का महत्वपूर्ण दायित्व होता है। सास-बहु के मन-मुटाव से गृहस्थ जीवन ईर्ष्या, दुःख एवं शोक का मंडार बन जाता है। घर से सुख चैन हवा हो जाती है। अगर बहु के हाथ से कोई चीज टूट जाए तो सास कहती है- 'तेरी आँखे फुट गयी थी क्या, इतने पैसों का नुकसान कर डाला, बाप के घर से क्या लाई थी? फलतः बहु भी सास के मुँह लगती है। झगड़ा बढ़ता जाता है। कींतु दृश्य ऐसा होगा तो —'बहु के हाथ से कोई चीज टूट गयी, तो सास झटसे बोले कि बेटी ! वस्तु टूट गई तो क्या हुआ? नयी आ जाएगी। लेकिन तुझे तो कहीं लगा तो नहीं! अगर तुझे कुछ हो गया, तो मेरी फूलसी बहु वापस

कहाँ से मिलेगी ! यह बात सुनकर बहु के मन को पश्चाताप होगा। बादमें वह हर चीज संभलकर इस्तेमाल करेगी। और कहेगी कि आप कितनी अच्छी है ! मेरी माँ से भी आप ज्यादा ध्यान रखती हैं! आपको पाकर मुझे तो माँ की याद तक नहीं आती।

अर्थात दृष्टि का परिवर्तन होने से स्नेह का वातावरण बढता है। बहु सास को माँ समझे, सास बहु को बेटी समझे, तो लढाई खत्म। सब कुछ अपनेपन में सिमट जाएगा। दृष्टि बदल दीजिए विचार अपने आप बदल जाएगें। किंतु वास्तविक बात तो यह है कि बेटी और बहु में फर्क गिना जाता है। अगर ये फर्क, भेदभाव वगैरा मिट जाए तो आप स्वर्गसुख लुट सकते हैं। आपको अपना घर स्वर्ग बनाना है तो बहु को प्रेम से अपने रीति-रिवाज सिखाइए। तभी वह अपने आप आपके परिवार में हिलमिल जाएगी। उसके हर काम में उत्साह बढाइए, प्रेम दीजिए। नई नवेली बहु आपके घर में आती है। अतएव आपके घर के तौर तरीके इसके लिए नये होते हैं। उसके कुछ समझ मे नहीं आता। इसलिए वह पीहर जैसा बर्ताव करती है। बहु को भी चाहिए कि सास, नंणद, ससुर तथा आदि घर के सदस्यों से प्रेम के साथ बर्ताव करे। बारबार घर में मायके की बात करके जहर घोलने का काम न करे। अगर सभी एक दुसरे से प्रेम का नाता रखेंगे तो घर की अनेक समस्याएँ हल हो जाएगी। घर के सभी व्यक्ति स्वस्थ एवं प्रसन्न रहेंगे। क्या यही स्वर्ग सुख नहीं है ?

❑ ❑ ❑ ❑

## सुनेहरी बातें

- मर्द की सुंदरता उसकी नम्रता में होती है।
- दान से धन में कमी नहीं आती।
- दुनिया में आपका सच्चा साथी दृढ संकल्प है।
- सहनशीलता का दुसरा नाम नारी है।
- जीवन फूल है तो प्रेम उसकी सुरभि।
- नि:स्वार्थ सेवा ही उत्तम भक्ति है।
- मनुष्य की सबसे बडी संपदा माँ है।

सं - कु. अनुजा शिराळकर
बी.ए.भाग-३

❑ ❑ ❑ ❑



# भारतीय उद्योग के शिल्पकार जे. आर. डी. टाटा

कु. गीतगंगा शेवाळे
बी.ए.भाग-३



1904-1993

भारत के उद्योग व्यवसाय के जन्मदाता और शिल्पकार जे. आर. डी टाटा याने जहांगीर रतनजी दादाभाई टाटा का जन्म १९०४ में पॅरिस में हुआ। भारत को अपनी कर्मभूमि मानकर उन्होंने नेत्रदीपक कार्य किया। हिंदुस्तान में नये-नये उद्योग संकुलों को शुरू किया। इन व्यवसाय के अतिरिक्त और कुछ करना था,किंतु नसीब ने उनका साथ नहीं दिया। कई व्यवसाय बहुत कम समय में चल बसे। उनका सपना अधूरा ही रह गया।

जे. आर. डी ने १९३२ में 'टाटा सन्स' नामक 'एअर लाईन्स' की शुरूआत की। शायद इसके आरंभ से हवाई जहाज का जन्म हुआ। वे १० फरवरी १९२९ में भारत के प्रथम वैज्ञानिक बने। १९३० में हवाई जहाज प्रति योगिता में भाग लिया किंतु यश उनके नसीब नही था। फिर आगे मेहनत करके उन्होंने पिताजी के ख्वाब पूरे कर दिये। पिता के दूरदर्शी सपनों के कारण इन्हें प्रेरणा मिलती गयी। वे पंडित नेहरू और गांधीजी के निकट भी रहे।

जे. आर. डी. ने भारत के निम्न उद्योगों को शुरू किया- टाटा आयर्न अँड स्टील, टाटा इंजिनियरिंग, टाटा पॉवर, टाटा ऑईल्स, टा... मिल्स आदि महत्वपूर्ण हैं। जे. आर. डी ने अ... क्षेत्रों के साथ विज्ञान, तंत्रज्ञान और संशोधन पर महत्वपूर्ण काम किया है। उनका कहना था कि, - भारतवर्ष में ज्ञानपूर्ण और कर्तव्यदक्ष व्यक्ति निर्माण होने चाहिए। उद्योग और व्यवसाय में अनेक प्रकार के शास्त्र तथा अर्थव्यवस्था का उन्होंने अध्ययन किया। सरकार को सही वक्तपर सलाह देकर प्रशासन में सुधार करा दिये। 'महात्मा गांधी' को उन्होंने अपना आदर्श माना। जे. आर. डी. का समस्त जीवन और व्यक्तित्व महान् दीपस्तंभ के समान है।

उन्होंने हर समय हिंदुस्तान में बसनेवाले गरीब और दरिद्रता से पीड़ित लोगों के प्रति सोच विचार किया। उन्होंने भारत के आर्थिक विकास को सुसंस्कृत बना दिया इसी कारण वे 'सन्मान' पाने योग्य मसीहा बन गये। बंबई के नजदीक बिजली प्रकल्प और बेंगलोर की विज्ञान संस्था स्थापित होने से पहले ही उनके पिता जमशेटजी टाटा की मृत्यू हुई। जिस वजहसे जे. आर. डी को जीवन में एक बडा 'सदमा' पहूँचा। इन्हीं छोटे-मोठे आघातों को झेलते हुए उद्योग धंदो का क्षेत्र बडा दिया। १९९३ तक अनेक उद्योग व्यवसाय का क्षेत्र पहले १० कंपनीयों में रहा है।

जमशेटजी के पश्चात् जहांगीर ने अपने बुध्दि कौशल से औद्योगिक इकाईयों को बड़े साहस के साथ संचालित किया। वे सच्चे रूपमें भारतीय औद्योगिक व्यवसाय के दीपस्तंभ माने जाते हैं। ऐसी महान आत्मा

का देहावसान २९, नवंबर १९९३ में हुआ। जे. आर. डी. टाटा का नाम कुशाग्र बुध्दि तथा उद्योग महर्षी के रूप में अजरामर रहेगा। इस महापुरुष को शतशः प्रणाम! शतशः प्रणाम।

❑ ❑ ❑ ❑

## शेरो-शायरी

- "चाँदनी चाँद से होती है, सितारो से नही
  प्यार एक से होता है, हजारों से नहीं॥"
- "तुफानों से डरकर कोई जहाज मंझिल नहीं पाता
  हिम्मत हारनेवाला इन्सान कभी इज्जत नहीं पाता॥"
- बादल आते हैं, लेकिन बरसात नहीं होती
  तेरी याद आती है, लेकिन मुलाकात नहीं होती॥"
- "अपना कहनेवाला ऐन वक्त पर पराया होता है
  नीयत अच्छी होतो, पराया भी अपना होता है॥"
- मिट जाएगें चाँद सितारे मिट जाएगा संसार
  इस दुनिया में अमर रहेगा
  सहेली-सहेली का प्यार॥"
- न इन्सान बडा होता है, न हैवान बडा होता है
  बडा वही होता है,जिसका जिगर बडा होता है॥"

सं - कु. सुधा कुलकर्णी
बी.ए.भाग-३

❑ ❑ ❑ ❑

## शेर-शायरी

- "फुल है गुलाब का खिलता ही रहेगा।
- "कौन कहता है कि तुम परी जैसी हो।
  हकिकत यह है कि परी तुम जैसी है॥"
- "मौत नहीं आती, इसलिए जिती हूँ।
  जीना नहीं आता, इसलिए रोती हूँ॥"
- "दुनिया मुझे दिवाना कहे इस बात का गम नही।
  गम इस बात का है कि मेरी कोई मंझील नहीं॥"

कु. धनश्री जाधव
बी.ए.भाग-१

❑ ❑ ❑ ❑



# सभ्यता आदमी है तो संस्कृति मानव

कु. प्रिया सावंत
बी.ए.भाग-१



सभ्यता मानव विकास की गलिशील सीढी है, और संस्कृति युग-युगों से पोषित जीवन मूल्यों के उच्च तर ढंग से निर्वहन की धरोहर। भौतिक सुख के लिए तरह-तरह की खोज करते हुए विकास की ओर कदम बढाना ही सभ्यता है। संस्कृति बौध्दिक चिन्तन के साथ उसके सत्य की खोज, सौंदर्य की अभिव्यक्ति और मानव प्रेम के विकास के प्रमुख तत्व को निरूपित करती है। इस लौकिक जीवन को सुखी बनाने के लिए तरह-तरह के साधन जुटाये जाते हैं। इनके रूप समाज के विकास के साथ सदैव परिवर्तित होता रहता है। यह विकसित अवस्था और इसमें सतत होनेवाला परिवर्तन सभ्यता है, जबकि संस्कृति मानव जीवन की आंतरिक अनुभूतियों की स्वतंत्र अभिव्यक्ति है। यह मानसिक प्रक्रिया है। सभ्यता के सूक्ष्म, शुध्द और उदात्त तत्वों के रचनात्मक व इसे पल्लवित व सुवासित करने की अनुभूति संस्कृति है।

अतित में भारतीय सभ्यता निरंतर आक्रांताओं से पदवलित रही, जिसके कारण भारतीय संस्कृति भी कई बार उपहास का पात्र बनी। विलियम आर्चर ने तो भारतीयता को असभ्य तक कह डाला। पर 'सत्यं शिवम् सुंदरम्' से पोषित भारतीय संस्कृति इन तमाम झंझावातों को झेलकर भी अक्षुण्ण रही। यही कारण है कि आज भारतीय जीवन दर्शन व ज्ञान के लिए पश्चिम जगत भी लालायित है।

भारतीय संस्कृति के बारे में श्री रवींद्रनाथ टाकूर ने कहा है - 'भारत महामानवों का सागर है - जिसमें कितनी नदियों की पावन धाराओं का जल है। जिसे हम भारतीय संस्कृति कहते है।' भारतीय संस्कृति एक विशाल सागर है! जिसमें अनेक नदियाँ (विभिन्न जातियों की सभ्यताएँ) आ. आकर समाहित होती रही। इसकी सहनशीलता सहिष्णुता के साथ सामंजस्य की अपरिमित शक्ति विद्यमान है। भारतीय संस्कृति एकता और समन्वय, विकास और समाधान. संपूर्ण समरसता और एक रूपता की कहानी है।

संस्कृति की प्रगती का आधार ज्ञान और अनुभव रहा है। सभ्यता निरंतर विकास के परिणाम स्वरूप जीवन का सम्यक ढंग है। सभ्यता का लक्ष्य यदि आदमी को बनाना है तो संस्कृति मानवीय बनना है, जिसके मूल गुण है. दया और परसेवा। इसे एक शब्द में कहे तो मानवोचित।

'आत्मवत् सर्वभूतेक' और 'त्याग के साथ भोग करों' इन मूल्य-मंत्रों के साथ भारतीय संस्कृति का प्राण तत्व 'वसुधैव कुटुंबकम्' की भावना है। अर्थात मानव मात्र 'सभ्य' ही नहो 'संस्कृत' भी हो। मानव शारीर और आत्मा दोनों के विकास, दोनों के मंगल, दोनों के सौंदर्य में ही मानवता का कल्याण अन्तर्निहित है।

❑ ❑ ❑ ❑

## यही है जिंदगी

जिन्दगी आँख की मानिंद है,
वही नजर आता है।

इन दुनिया की रस्मों को
इन बंधनों की दिवारोंको,
तोडकर कही दूर जाना
चाहती थी मैं ....।

कुछ और ही था,
जिससे तक्दीर टूट गयी मेरी
अब यह जिंदगी भर
रोती हूँ मैं....।

उन बीते हूये दिनों को,
उस बीत गए दिनों को,
अंजाने की तरह भुलना
चाहती थी मैं....!

इस दुनिया में कोई किसीका नहीं,
जिसपर जादा भरोसा होता है,
वही धोका देता है,उनके व्दारा
ठगती थी मैं....!

मगर जब,जब मैने उसे,
भुलना चाहा, मिलना चाहा,
तो वह मुझे और याद आया
आज उन्हीं यादों पर
हँसती हूँ मैं....!

कु. सीमा चव्हाण
बी.ए.भाग-१

## 'मन का मधुवन'

जाने कैसी परवशता है, जाने कैसा बंधन है;
उस धरती पर लौट न पायी जिस पर
बीता बचपन है।

भोलेपन की मृदु आशाएँ
सपना बनकर रह जाती,
जीवन की परिभाषा पल-पल
रुप विविध-से दिखलाती;

पलकों का प्रांगण गीला है,
होठों पर सूनापन है।
वे कदम्ब के गाछ अभी भी
हरियाली मुस्कान लिए,
करते होंगे सतत प्रतीक्षा
नव-पल्लव परिधान लिए;

दुविधाओं में उलझ गयी हूँ,
मन में केवल चिंतन है।
जानेवालों ! कह देना तुम
यह संदेश बयारों से,
उस माटी की गंध उडाती
गुजरें इन गलियारों से;

जिसकी याद सदा सरसाती,
मेरे मन का मधुवन है।

कु. विद्या सावंत
बी.ए.भाग-१



## 'हमें लक्ष्य पर बढना है'

काँप रहा तन बजते दांत,
सर्दी दिखा रही अपनी औकात॥
फैला हुआ धुंध का गात,
सूरज को भी देता मात॥

धूप हुई है हवा-हवाई,
समय लग रहा जैसे राई॥
इम्तहान सिर खडा हुआ है,
कोर्स ताड़-सा बड़ा हुआ है॥

लेना है हिम्मत से काम
हल करने है प्रश्न तमाम॥
करनी है छुट्टी की छुट्टी
खेल-कूद से अपनी कुट्टी॥

जी लगाकर हमें पढ़ना है
हमें लक्ष्य पर बढ़ना है॥
जो पढ़ने में ढील दिखाते
वही परीक्षा से घबराते हैं॥

कु. मीना काटे, बी.ए.भाग-३

## 'माँ'

जब हमें लगती है ठेस,
भैय्या ! मुँह से क्या निकलता है?
जब कोई दु:ख होता है,
हम नाम किसका लेते हैं?
जब आता है कठिण प्रसंग,
हम पूछ किसे लेते हैं?
जब पकडते है हम राह गलत,
सही मार्ग कौन दिखलाता है?
राजसिंहासन से बढकर सुख मिलता है,
किसकी गोद में बैठने से?
वह है सिर्फ माँ....माँ....माँ !

कु. बेबीताई माने, बी.ए.भाग-१



## 'सबला नारी'

समाज को जो नहीं मंजूर
वह राह तुम क्यों पकड्ती हो?
जिसके कारण होगा पतन
उसका हाथ क्यों थामती, हो?

जिसने अपने शरीर पर की है
काँटो की माला धारण,
उसीने ही सजाया सँवारा
फुलों को माथेपर॥

तुम कभी भूलना मत
भूलना मत, डरना मत,
डरने से बात नहीं बनती,
इसीलिए खिली है यहाँ बंसती॥

औरत तेरी यही कहानी
जिसमें है जीना, उसी में मरना।
क्यों पाप यह करती हो?
जिसके प्रायश्चित भी नहीं॥

आज ललकारें तुम्हें
यह अंधा समाज।
दिखा उसे आज तेरी फुत्कार
जमाने पर होकर सवार॥

कु. माया कुलकर्णी, बी.ए.भाग-३

## 'ये जीवन'

फिर नहीं आना
मालूम तो है
फिर कितने पल की क्या हमें
कर्म के द्वार पे छोड़ती है।

हम देखते भी है कि
जीवन आनन्द का झरना भी है
जो दर्द के काँटे को लेकर भी
बहता ही रहता है।

हे जीवन, हे पल
तू तो चला है क्या
सदा के लिए
बस मीठी मीठी यादें
तो छोड़ दे लिए।

कु. [illegible] शिंदे, बी.ए.भाग-२

## 'स्मारक'

ईश्वर मन्दिर में रहा
हमने कभी न देखा
ईश्वर के ही द्वार पर
मर रहा है भूखा।
भूखा क्यों ईश्वर की
दुनियाँ में है विराजमान,
खड़े रहे द्वार पर बालक
लेकर दिल में अरमान।
हे कैसा न्याय ईश्वर!
कैसा तू है रखवाला!
खुदाई का नहीं तेरे-
किसने बनवाया स्मारक।

कु. संध्या भोसले,
बी.ए.भाग-३

## 'सपनों पर अधिकार'

जीवन तो अपना है पर
सपनों पर अधिकार नहीं।
ढूंढते तो लाखों है लेकिन
मोती सभी को मिले नहीं।
दर्पण अपना है तो क्या?
बस छाया है नजर नहीं।
श्रृंगार करते है सब लेकिन
मन की सुन्दरता तो नहीं
जिंदगी तो मिली है हमें
पर ध्येय सभी का सफल नहीं।
चलते है लाखों लेकिन
मंजिल सभी को मिली नहीं।

कु. संध्या पाटील, बी.ए.भाग-१

## 'क्या करते है हम!

चाँद पर जाकर भी
अंधश्रद्धा मानते हम।
सुशिक्षित होते हुए भी,
दहेज माँगते है हम।

सच मालूम होते हुए भी,
झूठ की तरफ करते है हम।

नेता होते हुए भी,
काले धंदे करते है हम।

भारत में रहते हुये भी,
विदेश का गुण-गान करते है हम।

वास्तविकता जानते हुए भी,
सपने सजाते है हम।
होती चाह फूलों की,
मगर काँटों से घिर जाते है हम।

कु. उज्वला पाखले, बी.ए.भाग-२



॥ स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद ॥
पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील

Rayat Shikshan Sanstha's
Mahila Mahavidyalaya, Umbraj

# TRIVENI

## English section

"The might has a thousand eyes,
And the day but one;
Yet the light of the bright world dies
With the dying sun
The mind has a thousand eyes
And the heart but one;
Yet the light of a whole life dies
When love is done"

F. W. Bourdillon

Section Editor : Prof. L.P. Jadhav M.A.(English)

# FASHIONS

Miss.Deshmane S. V.
B.A.-I

It is generally beleived that life is beauty in variety and variety is the spice of life. As it is said that men differ as minds differ, in the same way fashions differ as men differ. Every day a new fashion comes up and old fashion dies out - fashion brings an advance in every movement in human being in his clothing, hair style etc.

Now a days man is known by his fashion. A man without fashion seems to be a backward one. If we look around we shall see the use of long sleeves, sleeveless, bell bottoms, elephant bottoms tight pants, guru shirts, jeans, lungi-kurtas, pony tails, big tails, bobbed hair, shankar-hair style, the use of high heels, maxis and mini skirts. Various coloured sarees, and blouse and everything. Fashion brings inspiration in human life. If you wear long hair you will feel like the poets like Shakespeare, Milton and shelley too. If you wear rustling and colourful dress, you will walk in graceful gait. The people in the street will have a look at your dress and they will forget their worries, anxieties and miseries at least for a while. Fashion brings relief in human life.

Fashion covers the differences in the castism. We become unaware about the caste difference and look at the fashionable man without grudges in our minds. We can hide our physical drawbacks e.g. a dwarf woman will use high heels and will appear tall and smart one. A blind man will use goggles and hide his blindness. Even ugly man will becom beautiful and charming. So fashion can bring new way of hope in human mind.

Again fashion brings competition in human life. Fashion makes a man fearless, cheerful and hopeful about his future life. A fashionable man - tries to maintain his prestige in society. So fashion is a blessing to the modern world.

Fashion makes our life joyful, happy, clean and flowing. Life without fashion is like a flower without scent, a man without life, and a desert without oasis and rain without rainbow. Modern man desires happiness in his life and fashion fulfils this desire of man. Majority of men love fashion. So 'fashion' is the keyword for modern man. So we say that modern age is not perhaps the age of science but it is the world of fashions.

❑ ❑ ❑ ❑

## -: Thoughts :-

1) If money is lost, nothing is lost
If health is lost, something is lost
If character is lost, everything is lost.

2) Respect and reason wait on wrinkled age.

## Belief

Belief is a life
Life is a belief, Love is belief
Relation of minds is belief
Brotherhood loved is belief
Unity is belief, Prosperity is belief.
without belief is not life,
without belief is not success.
Life of the world, without belief,

There is nothing in human life,
That immortalizes without belief.

Shinde Pramila Balaso, B. A. I.

# वार्षिक अहवाल १९९३-९४

## सांस्कृतिक मंडळ

सन १९९३-९४ या शैक्षणिक वर्षात सांस्कृतिक मंडळाच्या वतीने विविध स्वरुपाचे कार्यक्रम साजरे करण्यात आले.

प्राचार्य ई.जी.निकम यांची तेथून बदली झाली व त्यांच्या जागी प्राचार्य डी.डी.थोरात आले. प्राचार्य ई.जी.निकम यांना निरोप व प्राचार्य डी.डी.थोरात यांचे स्वागत असा दुहेरी कार्यक्रम आम्ही आयोजित केला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्राचार्य शिवाजीराव पाटील यांनी भूषविले होते. हा कार्यक्रम मोठ्या भावपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी उंब्रजमधील तिन्ही शाखांच्या वतीने कर्मवीर जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कर्मवीरांच्या प्रतिमेची गावातून मिरवणूक काढण्यात आली. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्राचार्य एन.डी.पाटील होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान बॅ.पी.जी.पाटील यांनी भूषविले होते. यावेळी महाविद्यालयाच्या इमारतीचा कोनशिला समारंभ प्राचार्य एन.डी.पाटील यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. कर्मवीर जयंती समारंभात तिन्ही शाखांचे सेवक व गावातील आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. या समारंभाच्या प्रमुख पाहुण्या प्रा.डॉ.सुमन पाटील होत्या. अध्यक्षस्थान प्राचार्य शिवाजीराव पाटील यांनी भूषविले होते. प्रा.डॉ.सुमन पाटील यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्याचा आढावा घेऊन विद्यार्थीनींना बहुमोल मार्गदर्शन केले.

याशिवाय स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन इ. कार्यक्रम साजरे केले. प्राचार्य डी.डी.थोरात यांच्या मार्गदर्शनामुळे सर्व कार्यक्रम मोठ्या उत्साहाने साजरे झाले. सांस्कृतिक मंडळातील सर्व सदस्य व कार्यालयीन सेवक यांचे उत्तम सहकार्य लाभले. सर्वांचे मनःपूर्वक आभार.

प्रा.बी.पी.पाटील
प्रमुख
सांस्कृतिक मंडळ

❑ ❑ ❑ ❑

## स्टाफ अकॅडमी अहवाल

स्टाफ अकॅडमीच्यावतीने सन १९९३-९४ मध्ये विविध विषयावरील शोधनिबंधाचे वाचन प्राध्यापकांनी केले. त्या शोधनिबंधाच्यावेळी चर्चाही अतिशय चांगली झाली. त्यामुळे विविध विषयांची माहिती प्राध्यापकांना मिळाली.

यावर्षी सादर केलेले शोधनिबंध खालीलप्रमाणे :

१. प्रा.बी.पी.पाटील - महानुभाव पंथाचे स्वरुप व तत्त्वज्ञान
२. प्राचार्य डी.डी.थोरात - काश्मीर समस्या
३. प्रा.एल.पी.जाधव - मॉडर्न इंडो ॲंग्लियन नॉव्हेलस्
४. प्रा.आर.एस.म्हात्रे - भारतीय सामाजिक समस्या
५. प्रा.एन.आर.सूर्यवंशी - मराठवाडा विद्यापीठ नामांतर योग्य की अयोग्य ?
६. प्रा.एस.डी.भोसले - संत तुकाराम यांचे समाज प्रबोधन
७. प्रा.एम.एम.पाटील - डंकेल प्रस्ताव
८. प्रा.आर.एस.यादव - राष्ट्रीय एकात्मता:एक समस्या.
९ प्रा.ए.एस.खाडे - भूकंप
१०. प्रा.सौ.एस.आर.माने - मदर तेरेसा यांचे समाजकार्य
११. प्रा.जी.एन.ढाले - महात्मा फुले यांचे शैक्षणिक व सामाजिक विचार

१२. प्रा.एम.जे.शिवदास - संत कबीर:एक चिंतन
१३. प्रा.एम.एस.मुजावर - महानगरीय समस्या

अशा प्रकारे सन १९९३-९४ या वर्षातील स्टाफ अॅकॅडमीच्यावतीने शोध निबंध वाचून प्रत्येक अधिव्याख्यात्याने आपले उद्बोधक चिंतनीय विचार अमुलाग्र शब्दातून व्यक्त केले. या समितीचे सदस्य प्रा.मारुफ मुजावर यांचेही उत्तम सहकार्य लाभले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे मा.प्राचार्य डी.डी.थोरात यांनी वेळोवेळी आम्हाला मोलाचे मार्गदर्शन केले. प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनीही उत्तम सहकार्य केले. वरील शोध निबंध वाचणारे प्राध्यापक सहकारी यांचा मी ऋणी आहे.

प्रा.एस.डी.भोसले
चेअरमन

□ □ □ □

## सहल विभाग

निसर्गाच्या सान्निध्यात राहून शिक्षणाचा लाभ घेणे अथवा भ्रमंतीमधून शिक्षण यानुसार सहलीचे आयोजन केले जाते. त्यानुसार दैनंदिन जीवनातून बाहेर पडून निसर्गाच्या सहवासात विद्यार्थीनींना भटकंती करता यावी, नैसर्गिक सृष्टीसौंदर्याचा व ऐतिहासिक स्थळांचा शैक्षणिक दृष्ट्या लाभ घेता यावा या हेतूनेच सहलीचे आयोजन केले.

या सहलीमध्ये महाविद्यालयाच्या प्रथम, द्वितीय व तृतीय वर्ष कला शाखेतील विद्यार्थीनींनी उत्स्फुर्तपणे सहभाग घेतला. या सहलीमध्ये महाबळेश्वर, प्रतापगड व रायगड ही सह्याद्रीच्या अंगाखांद्यावर असणारी, प्रतापगाजवळलेली, शिवराज्याभिषेक सोहळ्याची आठवण करून देणारी ऐतिहासिक किल्ल्यांची ठिकाणे, तसेच दक्षिण काशी म्हणून ओळखण्यात येणारे हरिहरेश्वर हे, ठिकाण व महाराष्ट्रातील सागरी किल्यामध्ये ज्याचे नाव अजिंक्य म्हणून घेता येईल तो जंजिरा इ. ठिकाणांचा समावेश केला होता. महाराष्ट्राच्या पश्चिमेस असणाऱ्या अथांग अशा अरबी सागुद्राच्या फेसाळत येणाऱ्या लाटांना पदस्पर्श करून ही सहल दि. २१ व २२ फेब्रुवारी रोजी एकावन्न विद्यार्थिनींनी व चेअरमन प्रा.खाडे, प्रा.सूर्यवंशी, प्रा.मुजावर, प्रा.सौ.माने यांनी पूर्ण केली.

या सहलीस विद्यार्थीनींचा उत्तम प्रतिसाद मिळाला. या सहलीस आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य साहेब यांचे मार्गदर्शन, सहल विभागातील सहकारी प्राध्यापक यांची मोलाची साथ व सहकार्य इ. मुळेच या सहलीचे आयोजन व नियोजन चांगल्याप्रकारे करून विद्यार्थीनींच्या ज्ञानात व आनंदात भर पडली. त्यावद्दल वरील सर्वाचे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत. शेवटी मी त्यांचा ऋणी आहे.

धन्यवाद!

प्रा.अशोक खाडे
चेअरमन
सहलविभाग

□ □ □ □

## लोकसंख्या शिक्षण मंडळ

प्रतिवर्षाप्रमाणे सन १९९३-९४ या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयामध्ये 'लोकसंख्या शिक्षण मंडळाची' स्थापना करण्यात आली. सर्व विद्यार्थीनींना लोकसंख्या शिक्षण मंडळामध्ये सहभागी करून घेण्यात आले. विद्यापीठाच्या आराखड्यानुसार वर्षभरात विविध कार्यक्रम राबवण्यात आले.

विविध कार्यक्रमामध्ये दि. १४.७.९३ रोजी जागतिक कुटुंब कल्याण दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्रा.म्हात्रे व प्रा.यादव यांनी आपले विचार व्यक्त केले. ८ सप्टेंबर १९९३ हा आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन साजरा करण्यात आला. प्रा.मुजावर व प्रा.म्हात्रे यांनी विद्यार्थीनींना साक्षरतेचे महत्त्व पटवून दिले. प्राचार्य श्री.डी.डी.थोरात यांनी विद्यार्थीनींना निरक्षर व्यक्तींना साक्षर करण्याचे आवाहन केले.

विद्यार्थीनींच्या सुप्त कलागुणांचा विकास व्हावा यासाठी निबंध व वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. दि. ३.१.९४ रोजी वक्तृत्व स्पर्धा व दि. ६.१.९४ रोजी निबंध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. निबंध स्पर्धामध्ये कु.घोरपडे एस.पी., कु. भरमे वाय.के., कु.भोसले एस.एस. व वक्तृत्व स्पर्धामध्ये अनुक्रमे कु.जाधव एस.जी., कु.खुंटाळे एस.एम., कु.सावंत व्ही.एम. यांनी उल्लेखनीय यश संपादन केले.

त्याचबरोबर डॉ.सौ.माधुरी कोडुगले यांचे दि. १८.२.९४ रोजी 'आरोग्य व बालसंगोपन' या विषयावर व्याख्यान झाले. विद्यार्थीनींनी विचारलेल्या शंकांची त्यांनी समर्पक उत्तरे दिली. इतर विविध कार्यक्रमाबरोबरच अंधश्रद्धा निर्मूलन कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले. यात अंधश्रद्धेवर काही प्रात्यक्षिकेही दाखवण्यात आली.

त्याचप्रमाणे लोकसंख्या शिक्षणाची आवश्यकता, महिलांचा सामाजिक दर्जा, लोकसंख्या वाढीचे दुष्परिणाम इ. विविध विषयावर प्रा.बी.पी.पाटील, प्रा.एल.पी.जाधव, प्रा.खाडे यांनी व्याख्याने दिली. दि. ६.१.९४ रोजी शिवाजी विद्यापीठातील या विभागाचे सहाय्यक संचालक डॉ.विश्वास यादव यांनी महाविद्यालयास भेट देऊन कामकाजाची पहाणी केली. वरीलप्रमाणे या विभागाच्या वतीने विविध कार्यक्रम राबविण्यात आले आहेत. हे कार्यक्रम राबवत असतांना महाविद्यालयाचे प्राचार्य श्री.डी.डी.थोरात, समिती सदस्य प्रा.म्हात्रे व प्रा.मुजावर, इतर सर्व प्राध्यापक, शिक्षिकेतर कर्मचारी व विद्यार्थीनी यांनी सहकार्य केले.

प्रा.मिलींद पाटील
चेअरमन, लोकसंख्या शिक्षण विभाग

□ □ □ □

## ग्रंथालय अहवाल

महाविद्यालयाच्या अनेक विभागापैकी ग्रंथालय विभाग हा एक महत्वाचा विभाग आहे. ज्ञान साधनेच्या प्रमुख साधनामध्ये ग्रंथालयाचे महत्त्व अनन्य साधारण आहे. महिला महाविद्यालय पाच वर्षे पूर्ण करीत असतांना या अल्पशा कालखंडात आपल्या ग्रंथालयाने निश्चितच भूषणावह प्रगती केली आहे.

प्रत्येक विद्यार्थीनींना आठवड्यातून दोन वेळा बारो कार्डावर पुस्तके दिली जातात. अंकव्यवस्थादर क्रमिक पुस्तके संदर्भग्रंथ, प्रश्नसंच व मासिके ग्रंथालयाच्या वेळेत दिली जातात. विद्यार्थीनी, प्राध्यापक व सेवकवर्ग यांना ताज्या घडामोडींची माहिती व्हावी म्हणून वर्तमानपत्रे घेतली जातात. तसेच विविध विषयावरील साप्ताहिके, मासिके, पाक्षिके घेतली जातात. स्पर्धात्मक परीक्षेकरिता लागणारी पुस्तके ग्रंथालयात असून त्याचा फायदा विद्यार्थीनी घेत असतात. कांही स्पर्धात्मक पुस्तकांची संख्या वाढविण्याचा विचार आहे.

"Library is growing organism" या तत्वावर अटळ निष्ठा ठेऊन ग्रंथालय समृद्ध व सुसज्ज करण्याकरिता माननीय प्राचार्य थोरातसाहेब सदैव प्रयत्नशील असतात. त्यांचे कुशल व अमूल्य मार्गदर्शन आम्हाला सदैव लाभत असते. ग्रंथपाल, सेवक श्री. कुमार निकम, शिक्षकेतर कर्मचारी, प्राध्यापक, विद्यार्थीनी या सर्वांच्या सहकार्याने ग्रंथालय प्रगतीकडे वाटचाल करीत आहे.

सर्वांचे मनःपूर्वक आभार!

श्री.गोडसे एस.आर.
ग्रंथपाल

प्रा.महिपती ज.शिवदास
चेअरमन
ग्रंथालय कमिटी

□ □ □ □

## राष्ट्रीय सेवा योजना

महाविद्यालयातील विद्यार्थीनींना खेड्यातील ग्रामीण जीवनाची माहिती व्हावी यासाठी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेची सुरुवात करण्यात आली. विद्यार्थीनींमध्ये सहजीवनाची व श्रमप्रतिष्ठेची गोडी निर्माण करणे, जबाबदारी व शिस्तप्रियतेची जाणीव निर्माण करून राष्ट्रप्रगतीला हातभार लावणे, निरक्षरता, लोकसंख्यावाढ, बेकारी, राष्ट्रीय एकात्मता, पर्यावरण इ. समस्यांची जाणीव विद्यार्थीनींच्यामध्ये निर्माण करणे यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्यावतीने प्रयत्न करण्यात आला.

आमच्या महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवायोजनेत एकूण ५० विद्यार्थीनी आहेत. सन १९९३-९४ या वर्षीचे विशेष श्रमसंस्कार शिबीर मौजे पेर्ले ता. कराड, जि. सातारा या ठिकाणी घेण्यात आले होते. या शिबीरामध्ये एकूण

४० विद्यार्थीनी सहभागी झाल्या होत्या. शिबीर दि. १० डिसें. ९३ ते १९ डिसें. ९३ या कालावधीत घेण्यात आले. शिबीराचा उद्घाटन सोहळा दि. १० डिसें. १९९३ रोजी श्री. के.के.घाडगे, सहसचिव, माध्यमिक विभाग, रयत शिक्षण संस्था, सातारा यांच्या उपस्थितीत व महात्मा गांधी विद्यालय, उंब्रजचे प्राचार्य श्री.एस.ए.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य श्री.डी.डी.थोरात, पेर्ले गावचे सरपंच श्री. प्रकाशराव चव्हाण व पेर्ले गावचे कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते. विशेष शिबीरामध्ये रस्ते सफाई, गटार सफाई, प्राथमिक शाळा परिसर स्वच्छता, महात्मा गांधी विद्यालय भाग शाळा पेर्ले या शाळेच्या परिसराची स्वच्छता, कबड्डी-खोखो, ग्राऊंडची स्वच्छता इ. कामे विद्यार्थीनींनी श्रमदानाने पार पडली.

त्याचबरोबर अंधश्रद्धा निर्मूलन, राष्ट्रीय एकात्मता, महाभारतातील युधिष्ठिर, स्त्रिया व बालसंगोपन, जनावरांचे आजार व काळजी इ. विविध विषयावर मान्यवर व्याख्यात्यानी आपले विचार व्यक्त केले. समारोप समारंभ दि. १९ डिसें. १९९३ रोजी प्राचार्य आर.डी.गायकवाड, शिवाजी कॉलेज, सातारा यांच्या उपस्थितीत पार पडला. अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य श्री.डी.डी.थोरात यांनी भूषविले होते.

वर्षभराच्या नियमीत कार्यक्रमामध्ये वृक्षारोपण, गाजर गवत निर्मूलन, पेर्ले व उंब्रज परिसरातील प्राथमिक व माध्यमिक शाळांना भेटी देऊन परिसर स्वच्छता केली. मनोरंजनाचे कार्यक्रम केले. १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिन, २२ सप्टेंबर कर्मवीर डॉ.भाऊराव पाटील जयंती, २६ जानेवारी गणतंत्र दिवस इ. कार्यक्रमामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवीकानी सहभागी होऊन उत्तम प्रतिसाद दिला. पेर्ले येथे साक्षरता दिंडी, दारुबंदी, एडस् विषयी जनजागृती इ. उपक्रम पार पाडले.

विशेष श्रमसंस्कार शिबीरासाठी व वर्षभरातील विविध कार्यक्रम राबवण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य श्री.डी.डी.थोरात, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, त्याचबरोबर प्रा.मिलींद पाटील, प्रा.सौ.एस.आर.माने, या समिती सदस्यांचे मौलीक सहकार्य लाभले.

**प्रा.एन.आर.सूर्यवंशी**

प्रकल्पाधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना

❑ ❑ ❑ ❑


**दि प्रेस अँड रजिस्ट्रेशन ऑफ बुक्स ॲक्ट नियम ८,फॉर्म नं. ४ प्रमाणे आवश्यक असलेली माहिती**

| | | |
|---|---|---|
| प्रकाशन स्थळ | :- | महिला महाविद्यालय, उंब्रज |
| प्रकाशन काल | :- | वार्षिक |
| मुद्रकाचे नांव | :- | संदेश शहा |
| राष्ट्रीयत्त्व | :- | भारतीय |
| पत्ता | :- | प्रिन्ट ओम ऑफसेट,२६९, ब/२ दौलतनगर, सातारा. फोन-२१०४९ |
| प्रकाशकाचे नांव | :- | प्राचार्य डी. डी. थोरात |
| राष्ट्रीयत्त्व | :- | भारतीय |
| पत्ता | :- | महिला महाविद्यालय, उंब्रज, |
| संपादकाचे नांव | :- | प्रा. बी. पी. पाटील |
| राष्ट्रीयत्त्व | :- | भारतीय |
| पत्ता | :- | महिला महाविद्यालय, उंब्रज, |
| मालकी | :- | महिला महाविद्यालय, उंब्रज,(रयत शिक्षण संस्था, सातारा) |
| प्रकाशक | :- | प्राचार्य डी. डी. थोरात |

या अंकात प्रसिध्द झालेल्या लेखातील मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

– संपादक